शनिवार । १९ ऑक्टोबर १९७४
एक रुपया

# माणूस

सी. एम्. ऑफिसची तयारी करण्याआधी बाथरूममध्ये गेले होते. विश्वासराव दाभाड्यांना नागपूरहून आलेल्या आपल्या चिरंजिवांच्या ट्रंककॉलने नुकतीच जाग आणली होती. जीवनराव वाघमारे अमरावतीला आपली प्रवासाची बॅग भरण्यासाठी आपल्या तरुण मोलकरणीची मदत घेत होते. कृषिमंत्री माणिकराव पाटील आपल्या जावयासह मुंबईचं विमान पकडण्यासाठी आपल्या लांबलचक काळ्या डॉजमधून औरंगाबादच्या चिखलठाणा विमानतळाकडे निघाले होते. ठिकठिकाणचे पेपर्स विकणारी पोरे मोठमोठ्यानं मथळा ओरडत होती, ' अर्थमंत्र्यांचा राजीनामा.... मुख्यमंत्र्यांच्या आसनाला सुरुंग '.... ठिकठिकाणचे आमदार, खासदार बातमीदार आणि तमाम जनता रसिकतेने आणि आपापल्या दृष्टिकोनातून या बातम्या वाचीत होती....

**' मुंबई दिनांक ' या सध्या गाजत असलेल्या कादंबरीचे लेखक अरुण साधू यांच्या आगामी कादंबरीचे एक प्रकरण--**

## माणूस दिवाळी अंकात

शिवाय

## मी गॉर्की बोलतो आहे....

सुमती देवस्थळे


तुमच्यात खूपच बदल झालेला दिसतोय!
केंद्रीय मंत्रिमडळात फेरबदल झाले ना?


हं! अन् लिही पुढे. अमेरिकन मुलीशी लग्न करून येथे येऊ नकोस... स्मगल्ड वस्तूवर येथे बहिष्कार आहे...


देशात लॉ अँड ऑर्डर
वांद्यात असतांना ऑर्डर
ऑफ लेनिन घ्यायला
कसंसंच वाटतं!


सासूबाई! आता
परत बजावून ठेवतेय हं.
यापुढे तुमचे रॅगिंग
फार चालू देणार नाही!
मी परत येईपर्यंत
स्वैपाक करून
ठेवा... कळलं?
श्यामजोशी

# साप्ताहिक माणूस

| | | | |
|---|---|---|---|
| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | १९ ऑक्टोबर | अंक : एकविसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


# हिमालयाच्या अलीकडे आणि पलीकडे

हिंदुस्थानात डांगे आणि त्यांचे सहकारी ज्या सुमारास कम्युनिस्ट पक्षाची बांधणी करीत होते त्याच सुमारास चीनमध्येही कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली. पण गेल्या पन्नास वर्षांतील या दोन्ही कम्युनिस्ट पक्षाच्या वाटचालीत केवढी तफावत पडली ! चीनमध्ये कम्युनिस्ट पक्ष केवळ सत्तेवर आला एवढेच नाही; नवचीनची या *काळात उभारणीही झाली. चिनी माणसाचे जीवनमान सुधारले,* सामाजिक संबंधात बदल घडून आले, जागतिक सत्ता म्हणून चीनला मान्यता लाभली. हिंदुस्थानात मात्र कम्युनिस्ट पक्षाची सतत पिछेहाट होत गेली. स्थापनेपासून महायुद्ध सुरू होईपर्यंतच्या काळात या पक्षाची कमान चढती होती. बेचाळीसनंतर मात्र ही कमान ढासळत गेली. सध्या तर बिहारसंबंधी पक्षाने घेतलेल्या जनताविरोधी भूमिकेमुळे ही कमान जमिनीत पुरती गाडलीच गेलेली आहे. जयप्रकाशांना 'गुड', सी. आय्. ए.चे हस्तक म्हणून या पक्षाने ठरवावे यापेक्षा भारतीय जनमानसाचे अज्ञान अधिक भयानक असू शकत नाही. डांगे यांचा अमृत महोत्सव साजरा झाला, डांगेकन्या रोझा देशपांडे मुंबईतून लोकसभेवर निवडून गेल्या किंवा केरळात अच्युत मेनन यांचे मंत्रिमंडळ अधिकारारूढ असले तरी स्वतंत्र पक्ष म्हणून उजव्या कम्युनिस्टांचे अस्तित्व जवळ जवळ संपलेले आहे. डावेही बंगाल-केरळव्यतिरिक्त कुठे उभे नाहीत. हिंदुस्थानपुरते बोलायचे झाल्यास लाल क्रांतीच्या सर्व वाटा आज तरी रोखलेल्या दिसतात. हिमालयापलीकडे, आपल्या शेजारीच असलेल्या, आपल्याप्रमाणेच प्रचंड आकार व प्राचीन परंपरा लाभलेल्या चीनमध्ये पन्नास वर्षांच्या कालावधीत राज्यक्रांती व समाजक्रांती होते, लालसूर्य उगवतो व आपल्याकडे, मात्र या सूर्याला ग्रहणच लागते, असे का ? विचारसरणी एकच, मिळालेला कालावधीही दोन्हीकडे जवळपास सारखाच. मग यश प्राप्तीत हे जमीनअस्मानचे अंतर का पडावे ? दोन्हीकडच्या परिस्थितीचे वेगळेपण हे कारण मार्क्सलेनिनवादी पुढे करतील पण ते पुरेसे नाही, निर्णायक नाही. रशियापेक्षा चीनची परिस्थिती वेगळी होती, तरी चीनमध्येही लाल क्रांतीला यश लाभले. तशीच वेगळी परिस्थिती हिंदुस्थानात असली म्हणून क्रांती न होण्याचे काहीच कारण नव्हते. कुठल्याही दोन देशांची परिस्थिती तंतोतंत कधीही एकसारखी नसते. तेव्हा चीन आणि भारत यामधील परिस्थिती वेगळी होती हे चीनमधल्या दैदिप्यमान यशाचे व भारतातील दारूण अपयशाचे काही निर्णायक कारण ठरू शकत नाही. नेतृत्व या घटकाचा एक वेगळा, स्वतंत्र परिणाम यशापयशाला कारणीभूत ठरत असतो. जबरदस्त इच्छाशक्ती व सत्ताकांक्षा असलेल्या नेत्याचे इतिहासघडणीतील स्थान गृहीत धरावे लागते. चीनमध्ये माओ निर्माण झाला; हिंदुस्थानात माओच्या तोडीचे नेतृत्व कम्युनिस्ट पक्षाला लाभले नाही; त्यामुळे दोन्हीकडच्या यश:सिद्धीत एवढे अंतर पडले. *आपल्याकडे जातीभेद आहेत, भाषाभेद-प्रांतभेद आहेत, धार्मिक व* सांस्कृतिक विविधता आहे. चीनमध्ये हे भेद, ही विविधता नव्हती असे काहीजण म्हणतील. भारतात गेली दीडशे वर्षे एकछत्री अमल होता व आहे, चीनमध्ये राजकीय फुटाफूट होती हेही चीनमधील यशाचे व आपल्याकडील अपयशाचे एक कारण म्हणून पुढे केले जाईल. पण या सर्व कारणांवर टिळक मात करू शकले, गांधी-नेहरूंनी मात केली. आपल्याकडील अफाट दारिद्र्य, सामाजिक विषमता यामुळे तर कम्युनिस्टांना अशी मात करणं टिळक-गांधींपेक्षाही वास्तविक अधिक सोयीचे होते. शिवाय विसाव्या शतकातील एका अत्यंत प्रभावी व विजिगिषु तत्त्वज्ञानाचा वारसा त्यांना लाभला होता. काही अनुकूल असे जागतिक हितसंबंध, आंतरराष्ट्रीय लागेबांधे निर्माण झालेले होते. तरीही कम्युनिस्ट पक्ष येथे नामोहरम व्हावा, राज्यकर्त्यांनी टाकलेल्या चार तुकड्यांवर जगत राहण्याची नामुश्कीची पाळी या पक्षावर – या विचारसरणीच्या संघटनावर यावी याला, श्रेष्ठ नेतृत्वाचा अभाव याशिवाय दुसरे कोणते कारण असू शकते ? मार्क्सवादात हे कारण चपखल बसत नाही हे खरे; पण इतिहासाने या कारणाची सत्यता व महत्त्व आजवर अनेकदा निदर्शनास आणलेले आहे. लेनिन नसता तर रशियन क्रांती यशस्वी होऊ शकत नव्हती. असे श्रेष्ठ नेतृत्व भारतीय कम्युनिस्टांना लाभले नाही, हे खरे हिंदुस्थानातील कम्युनिस्टांच्या ससेहोलपटीचे मुख्य कारण आहे. डांगे किंवा त्यांच्यासहकाऱ्यांचा त्याग, बुद्धिमत्ता, त्यांनी भोगलेल्या हालअपेष्टा, त्यांची एकेकाळची लोकप्रियता व कामगारवर्गावरील पकड यांविषयी कुणीही आदरच व्यक्त करील. तेलंगणचा लढा, नक्षलवादी उठाव इत्यादी चळवळींचे क्रांतिकारकत्वही कुणी अमान्य करणार नाही. प्रश्न आहे, या सर्व ठिणग्यांचे ज्वालेत रूपांतर का होऊ शकले नाही ? हे सगळे निखारे लवकर विझून का गेले ? महान् नेतृत्वाचा अभाव याशिवाय दुसरे कारण या शोकांतिकामागे दिसत नाही.

खरोखरच येथे लेनिन, माओ, हो चि मिन्ह यांच्या तोडीचा

एखादा अव्वल दर्जाचा क्रांतिकारक भारतीय कम्युनिस्टांना नेता म्हणून लाभला असता तर त्याने नेमकी कोणती धोरणे अंगिकारली असती ? डावपेच कसे योजले असते ? समाजातील विविध वर्गांची, गटांची, जातीजमातींची एकजूट कशी बांधली असती ? सध्याच्या परिस्थितीत हा एक निष्फळ स्वप्नरंजनाचा विषय ठरतो हे खरे; पण असे वाटते, की येथील मध्यम वर्गाला आकर्षित करणारी कट्टर राष्ट्रवादी भूमिका व खेड्यापाड्यातील गरीब शेतकऱ्यांना, शेत-मजुरांना उद्योग व जमीन मिळवून देणारा जहाल आर्थिक कार्यक्रम याची बेमालूम सांगड घालणारा एखादा अभिनव पर्याय अशा क्रांतिकारक नेत्याने जनतेसमोर स्वातंत्र्योत्तर काळात ठेवला असता आणि जनतेनेही या पर्यायाचा उत्स्फूर्त स्वीकार केला असता, विजयश्रीची माळ या नेत्याच्या गळ्यात घातली असती. आर्थिक मागण्यामध्येच गुंतून राहिलेला कामगारवर्ग या पर्यायात कदाचित सुरुवातीला, आघाडीवर दिसला नसता. पण यामुळे काही बिघडत नव्हते. मार्क्सचे पोथीबद्ध अनुयायी फार तर अस्वस्थ झाले असते. पण पर्याय सिद्ध झालेला पाहिल्यावर त्यांनीही पोथ्यातून हवे तसे नवे अर्थ काढून दाखविले असते. लेनिनपेक्षाही हा पर्याय माओ, हो चि मिन्ह यांच्या अधिक जवळ जाणारा आहे. पण हिंदुस्थानात कदाचित हाच पर्याय लागू पडला असता, अजूनही पडण्याची खूप शक्यता आहे. पण यासाठी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ताबडतोब अशा क्रांति-कारक पक्षाने फाळणीविरोधी भूमिका घ्यायला हवी होती. शक्य त्या मार्गाने फाळणी मोडून काढण्याच्या उद्योगास हात घालायला हवा होता. कारण फाळणी हा भारतीय राष्ट्रवादाचा एक फार मोठा पराभव आहे आणि या पराभवाची खत येथील बहुसंख्य-जनतेच्या मनात अजूनही फार खोलवर घर करून आहे. बांगला देश मुक्त झाल्यावर येथील राष्ट्रभावनेला केवढे उधाण आले हे सर्वांनी पाहिलेले आहे, अनुभवलेले आहे. या उधाणाचा अर्थ व या भावनेची ताकद आपल्याकडील डाव्या क्रांतिकारक म्हणवणाऱ्या पक्षांनी अजूनही नीटशी ध्यानात घेतलेली दिसत नाही. या भावनेचा एकीकडे परि-पोष करीत असतानाच दुसरीकडे समतावादी आर्थिक व सामाजिक कार्यक्रमाची अंमलबजावणीही व्हायला हवी होती. शहरापेक्षाही या अमलबजावणीसाठी खेडेभाग हा अधिक अनुकूल होता. गांधीजीच्या खेड्यात चला या मंत्राला नवीन कलाटणी देऊन हे सर्व साधता आले असते. मध्यमवर्ग व शेतकरीवर्ग या दुहेरी चालीमुळे एकत्र आणता आला असता, चळवळ शहरात आणि खेड्यात पसरत राहिली असती. कामगारवर्ग केव्हातरी या प्रक्रियेत ओढला गेला असता हे निश्चित, कारण तोही समाजाचा एक घटकच आहे-इतर घटकांशी जोडला गेलेला, अनेक धाग्यादोऱ्यांनी एकत्र बांधला गेलेला. पण तोच नेतृत्व करील अशी वाट पहात बसणे हा भाबडेपणा आहे, मार्क्सवादाचा हा आंधळा स्वीकार आहे. मूळ मार्क्सवादी क्रांतीत शेतकरीवर्गाला स्थान नाही. लेनिनने ते प्रथम दिले आणि माओने तर या वर्गाला आघाडीवर आणून ठेवले. हिंदुस्थानात मध्यमवर्गाबाबत असेच, मार्क्सवादी क्रांतीला अभिप्रेत नसलेले स्थानांतर घडू शकले असते —अजूनही ही शक्यता दृष्टिआड करता येत नाही. असे सर्व वर्ग एकत्रित करीत करीत व्यापक आघाडी उभी करणे, प्रस्थापित राज्य-कर्त्यांना जनतेपासून अलग पाडणे हीच सर्व यशस्वी क्रांत्यांची पूर्वशर्त असते. ती पूर्ण झालेली असली तर शेवटी दहा—वीस वर्षातून केव्हा-तरी एखादा संधीचा क्षण येतच असतो. तो पकडण्याची जागरुक-ताही ठेवावी लागते. नेतृत्वाचा घटक महत्त्वाचा व निर्णायक ठरतो तो विशेषत: या टोकाच्यावेळी. गरूड आणि घार यांतील फरक याक्षणी स्पष्ट होऊन जातो. हिंदुस्थानातील कम्युनिस्टांना असा एकही गरूड पन्नास वर्षात लाभला नाही हे खरे त्यांचे दुर्दैव आहे.

अर्थात हे सगळे आज तरी स्वप्नरंजन आहे. कुणीच अशी गरूडझेप आपल्याकडे घेतलेली नाही, घेण्याची कुणाची तयारीही दिसत नाही. पण जर खरोखरच मुळापासून बदल हवा असेल, चालू परिस्थिती असह्य वाटत असेल तर अशी काही थक्क करणारी व वरवर पहाता परस्परविरोधी वाटणारी झेप बदल करू म्हणणाऱ्यांनी घ्यायला हवी. जुन्या चाकोऱ्या मोडायला हव्यात. नवीन व्यूह रचले जायला हवेत. डांगे व त्यांचे सहकारी यांच्याजवळ असे व्यूह रचण्याची, नवीन झेप घेण्याची थोडीफार शक्ती एकेकाळी होती असे दिसते. आता मात्र ही शक्यता फारफार दुरावलेली आहे.

**श्री. ग. मा.**

---


# श्रीग्रामायन

मूल्य
पंधरा रुपये

लेखक
श्री. ग. माजगावकर

राजहंस प्रकाशन
पुणे ३०


---

# तीन, चार, पाच ऑक्टोबर : संपूर्ण बिहार बंद

सदाशिव बागाईतकर

मेरे बहादुर भाई !

यह चिट्ठी बहुत कठिनाईसे आपके पास पहुँचा रही हूँ. आज पूरे बिहार की ऐसी हालत हो गयी है कि बहन और भाई के रिश्ते के बीच दमन की दीवार खडी है. हमे वह दिन याद है जब देश की रक्षा के लिये आप सीमा पार शत्रुओंसे झुझ रहे थे. हमारे आपके बीच एक रिश्ता बना था. पर आज वह रिश्ता टूट रहा है. रिश्ते को तोडने का काम कर रही है आपकी बदूक जो निरपराध, शांत और सत्याग्रही आदोलनकारियोंपर गोली दाग रही है...भ्रष्टाचार, महगाई और बेरोजगारीसे आप खुश हैं? क्या इनके खिलाफ आवाज उठाना अपराध है? आपके अदर के सोये इन्सान को जगाओ और सोचो कि इस कठिन घडीमें आपका फर्ज क्या है?... अगर तुम्हारी गोलीसे बच गयी तो तुम्हे राखी बांधनी आऊगी...

कुशलता की कामना के साथ
आपकी बहन

दोन ऑक्टोबरच्या 'सकल्प दिवसा'पासून बिहार बदच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली तेव्हापासून साऱ्या बिहारला व विशेषत: पाटण्याला 'छावणी' स्वरूप आले होते. एक लाख सी. आर. पी., पचेचाळीस हवाई बी. एस. एफ., शिवाय नेहमीचे बिहार मिलिटरी पोलीस व साधे पोलीस असा प्रचड फौजफाटा बिहारभर गोळा करण्यात येत होता. बिदीआच्या सरकारी विमानतळावर रात्रभर सारखी विमाने उतरत होती. उतरलेल्या सैनिकाना घेऊन ताब्यात घेतलेले ट्रक्स, बसेस यामधून रात्रभर बिहारच्या कानाकोपऱ्यात त्याना पोचविण्याचे काम सुरू केले. सर्व वातावरणात रात्रभर या धावपळीचा आवाज घुमत होता. पाटणा शहरात सचिवालयाकडे जाणाऱ्या सडकाच्यावर सभोवताली सर्वत्र तारा व बाबूचे अडथळे निर्माण केलेले. वायरलेस गाडयाची धावपळ वॉकी टॉकी वाळगणाऱ्या सैनिकाची सर्वत्र ठाणी, चौक्या. सर्व वातावरणात दबलेल्या हिंसेचे दुर्गंध. दानापूर, पटनासिटी यासारख्या उपनगरात शत्रूच्या फौजांशी घराघरांतून तुबळ युद्ध सुरू आहे असेच कोणास वाटावे. सरकारी दमनचक्राची खाडखाड चाल सर्वत्र चालू आहे आणि त्यावर केवळ जबरदस्त सकल्प रात्रीच्या जोरावर मात करण्यासाठी प्रतिज्ञाबद्ध, लढाऊ, युवक वर उद्धृत केलेले 'पुलिस भाईयो के नाम बहन की चिट्ठी' प्रत्येक शिपायापर्यंत पोचविण्याचा प्रयत्न करीत होते. त्या दिवसात ही 'चिट्ठी' फारच 'ख्यातनाम' झाली होती. शिपायी निर्भयपणे ती मिळविण्यासाठी वाटणाऱ्या भोवती गर्दी करीत.वाचून घडी करून तो ती चिट्ठी आपल्या जवळच ठेवीत. सरकारी हिंसेला उत्तर देण्यासाठी जवानांचा 'विवेक' जागा करण्यासाठी हा प्रयत्न फार अर्थगर्भ, परिणामकारक असल्याचे दिसून येत होते.

तीन ऑक्टोबर उजाडला तेव्हा प्रत्येक मोहल्ल्यातून, गावातून आदल्या दिवशीच्या सध्याकाळी झालेल्या सकल्प सभांच्या, कविसमेलनाच्या, 'नुक्कड समेलनाच्या उद्‌घोषाचे प्रतिध्वनी वातावरणातच होते. दोन तारखेच्या वर्तमानपत्रातून सर्व जिल्हा तालुक्यातून लोकांनी केलेल्या सामुदायिक निर्णयाच्या वार्ता होत्या. गावालगतच्या रेल्वेलाईनवर हजारो ग्रामीण बैठक मारून बसणार होते. कोठे सरकारी कार्यालयाना मुहरबद करण्याच्या घोषणा झाल्या होत्या. सडकेवर, रेल्वेवर सर्वत्र धोक्याची लाल निशाणी दोनला रात्रीपासून दिसत होती. भरून भरून जाणाऱ्या सशस्त्र पोलिसाच्या ट्रक्स् थाबवून ठाण्यापुढे जमून 'पुलीस हमारा भाई है, उससे नही लडाई है'च्या घोषणा होत होत्या. तीनच्या बदची सुरुवात अनेक ठिकाणी सकाळच्या प्रभात फेरीने झाली. पाटण्याला सकाळी सात वाजता दोन हजार सत्याग्रहीचा जत्था जयप्रकाशजीच्या नेतृत्वाखाली कदमकुवापासून दूरच्या सचिवालयाकडे निघाला. मार्गावरून जाता जाता गर्दी वाढत चालली, महिलाही सामील होऊ लागल्या. सचिवालयापासून दूर असलेल्या पहिल्या अडथळ्यापाशी काहीतरी 'घडेल' अशी दाट अफवा होती. रस्त्यात ठिकठिकाणच्या पोलीस चेक नाक्यावरून मिरवणूक जाऊ लागली तेव्हा गुरखी, बुमारू, मराठी, शीख सी. आर. पी., बराख एकचे जवान दिड्मूड होऊन घोषणा देणाऱ्या आबाल वृद्धाच्या या जमावाकडे पहात असल्याचे दिसत होते. 'रायट पोलीस'च्या वेताच्या ढाली, त्याची नवी चिलखते या सर्वांमुळे ते विशेष लक्षात येत. पण त्याच्याही चेहऱ्यावर प्रश्नचिन्हच दिसत होते. 'भ्रष्टाचार मिटायेंगे नया बिहार बनायेंगे' 'हरबार विद्यार्थी जीता है, इस बार विद्यार्थी जितेगा' इ. घोषणाशी व विशेषत: 'पुलीस हमारा भाई है उससे नही लडाई है' हे ऐकून आपण कोणाविरुद्ध गोळी चालविणार? असा भाव त्याच्या चेहऱ्यावर दिसत होती. कारण 'हमला चाहे जैसा होगा हात हमारा नही उठेगा' ही घोषणा ऐकून आपल्यावर चालून येणारा हा जमाव आहे हे त्याला कसे पटावे?'

पाटण्याचा मोर्चा कोठे अडविणार या सबधी सरकारी अधिकाऱ्यांच्या वर्तुळात शेवटपर्यत चर्चाच सुरू होती! मोर्चा क्षणाक्षणाला क्रुद्ध घोषणा देणाऱ्या विशाल पण समुद्राच्या वाढत्या लाटेप्रमाणे तो स्वरूप घेत होता. शेवटी सचिवालयाच्या अलीकडील महत्त्वाचे नाके आले आणि मोर्चा अडविण्याऐवजी अडविलेला रस्ता शिपायांनी



मोकळा केला आणि मोर्चा थेट कुलूप लावलेल्या सचिवालयाच्या दारापाशी थडकला. सचिवालयाच्या चारी बाजूला चार दरवाजे आहेत आणि सर्वत्र सत्याग्रही व निदर्शकांची प्रचंड गर्दी होती. वेग वाढत चालला. हजारो कर्मचारी बाहेर जमून त्या निदर्शनात सामील होऊ लागले तशतशी गर्दी वाढू लागली. सत्याग्रहींना ओलांडून आत नोकरीवर रुजू होणार नाही असा निर्णय कर्मचारी संघटनांनी अगोदरच जाहीर केला होता. पाटणा शहरात सर्वत्र सामसूम होती. तीस हजार सायकलरिक्षापैकी एकही रस्त्यावर नव्हती. खासगी वाहने, स्कूटर सर्व बंद. फक्त वृत्तपत्रे आणि '' संघर्ष समिती ' असे फलक लागलेली काही वाहने होती. हॉटेल्स उघडी ठेवण्याची परवानगी देऊनही प्रथम ती बंदच होती. सकाळी अकरानंतर त्यातील काही उघडू लागली. पानपट्टीची दुकानेही उघडली नाहीत त्यामुळे फारच कुचंबणा. दुपारी एक नंतर काही फरीवाल्यांना खाद्य पदार्थ घेऊन पहिल्या दिवशी स्वयंसेवकांचे बरोबर सचिवालयाच्या मैदानावर पाठवावे लागले. संपूर्ण पाटण्यात कडकडीत हरताळ होता. बिहारमध्ये इतरत्र काय होते ? कोठल्याही परिस्थितीत रेल्वे बंद रहाणार नाही अशी घोषणा सरकारने केली होती त्याचे काय झाले ? प्रत्येक मैलावर अगणित सशस्त्र शिपाई, खेडुतांच्यावर रेल्वे संरक्षणाची सक्ती अशा अनेक उपाय योजना सरकारने केल्या होत्या त्याचे काय झाले ? याची चर्चा, कुतूहलही सर्वत्र होते. पाटणाच्या सचिवालयाकडे दुपारपर्यंत १०–१२ हजाराचा समुदाय होता. अस्थिरपणे, घोषणा देत जयप्रकाशजींच्या बरोबर सर्वत्र तो हिंडत होता. हलके हलके वातावरणातील तणाव कमी झाला होता. संपूर्ण बंद झाल्याचे यश आणि काही अपवाद वगळता पोलिसांनी जमावाशी जमवून घेण्याचे ही धोरण ठेवले. ह्याचा हा परिणाम होता. सचिवालया समोरच्या मैदानात कवी संमेलनच सुरू होते. आंदोलनाच्या कविता गायिल्या जात होत्या. वृद्ध कवी ' नागार्जुन ' यांची कविता

' इंदुजी, इंदुजी क्या हुवा आपको, क्या हुवा आपको ?
क्या हुवा आपको ? क्या हुवा आपको ?
सत्ता के मोह मे भूल गयी बाप को,
छत्रों के खून का चसका लगा आपको–

फारच लोकप्रिय होती. पहिल्या दिवशीचा बंद संपला. बंद झालेल्या सर्वत्र बिहारभर बंदला अशीच साथ मिळाल्याचे जयप्रकाशजींनी जाहीर केले तेव्हा लोकांनी हर्षध्वनीने त्याचे स्वागत केले.

पृष्ठ २७ वर

# सप्रेम नमस्कार....

□ माणूसमधून बिहारवरील श्री. निळू दामले यांचा लेख वाचला. त्याच वेळी योगायोगाने चीनच्या पचविसाव्या स्वातत्र्य दिनानिमित्त इतर वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झालेले लेखही वाचण्यात आले. विशेषत: महाराष्ट्र टाईम्सने चीनवर अग्रलेखही लिहिलेला आहे.
गेल्या पचवीस वर्षात चीनने केलेली प्रगती भारतीय लोकराज्याच्या एकदर वाटचालीवर भलतीच उठन दिसते. याच वेळी निळू दामले यानी बिहारच्या परिस्थितीवर लिहिलेला लेख तर भारताच्या सद्य. परिस्थितीवर अत्यत झगझगीत प्रकाश टाकीत आहे आजच्या वर्तमानपत्रात वाचले ते असे, की काही प्रतिष्ठित कॉंग्रेसजन श्री. जयप्रकाश नारायण याच्यावर टीका करून त्यांनी (जयप्रकाशजीनी) आता हिमालयात जाण्याची वेळ आल्याचेही भाकीत करीत आहेत. जयप्रकाश ही व्यक्ती किंवा त्याचे १९४२ नतरचे राजकारण सोडा. एक राजकारणी माणूस म्हणून नव्हे तर केवळ एक सामान्य माणूस म्हणून जनतेची दु खे आणि राज्यात चाललेला भ्रष्टाचार जर भारताच्या वेशीवर टागण्याचे काम त्यानी केले किंवा करीत असले तर या तथाकथित द्रष्टया राजकारणी लोकानी त्या व्यक्तीचे स्थान हिमालयात ठरवावे हा केवढा विनोद आहे.
दामले याचा बिहारवरील लेख वाचून मन फार खिन्न झाले. त्यानी स्वत: तिथे जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीचे जे वर्णन केले आहे ते फार जबाबदारीने आणि केवळ मानवतेच्याच भूमिकेवरून केलेले असल्यामुळे ते मनाला अस्वस्थ करते.
गुजराथची परिस्थिती अजून जुनी झालेली नाही. तेथे जी नामुश्की राज्यकर्त्या पक्षाला पत्करावी लागली त्यापासून काही बोध घेणे तर दूरच पण लोकाच्या असंतोषाच्या आणि हालअपेष्टाच्या पार्श्वभूमीवर हे निगरगट्ट राजकारणी लोक एका सच्च्या (आजच्या) लोकनेत्याला हिमालयात जावयास सागतात; म्हणजे महात्मा गाधीच्या रामराज्यातील रामालाच हे गाधीचे अनुयायी वनवासात पाठवीत आहेत !
वाघाचे कातडे पाघरलेल्या गाढवाला इतिहासात धडा मिळाला. पण गेंड्याचे कातडे पाघरलेल्या आजच्या या प्राण्यांना कोण आणि कसा धडा शिकवील ते पहावयाचे आहे–

आपला

८–१०–७४ वि. शं. पारगावकर

स. न.

□ दि. ५-१० ७४ च्या 'माणूस'च्या अंकातील श्री. विनय धुमाळे यांचे उद्धट, उर्मट पत्र वाचून करमणूक तर झालीच, आणि सताप पण आला. केवळ दिलगिरी व्यक्त करून भागले असते. कारण केला अपराध त्यांना कबूल आहे. नाटक बघत असताना अगोदर मोठ्याने comments करणे, हेच मुळात गैर आहे. मग 'त्या comments फार तर पुढील रागेतच ऐकू जाण्याइतपत मोठ्या आवाजात होत्या, त्यामुळे स्टेजवरची पात्रे अथवा इतर लोक disturb होण्याचा प्रश्नच नाही, वगैरे म्हणजे फारच गैर. श्री. धुमाळे यांच्याच म्हणण्याप्रमाणे 'पुढील रांगेतील लोक' तरी disturb झालेच की नाही ? आणि 'स्टेजवरची पात्रे' पण disturb झालीच नसतील कशावरून ? पण मुद्दा तो नाही. 'पुढील रांगात comments ऐकू जाण्याइतपत मोठ्या आवाजात' सतत करीत राहणे, हाच मुळात शिष्टाचाराविरुद्ध गुन्हा आहे. आणि त्याविषयी 'दिलगिरी' व्यक्त करीत असताना 'श्री. पुष्पा भावे याचा टी. व्ही. शी तसा निकटचा सबध (कार्यक्रमाच्या सबंधाने) आला नसावा. म्हणूनच असा कमरेखाली वार करण्याचे त्यानी पत्करले असावे' असा अक्षम्य आरोप करणे म्हणजे तर अशिष्ट वर्तनाची हद्द झाली. हे श्रीमान् विनय धुमाळे स्वत.ला समजतात कोण ? टी. व्ही. चे डायरेक्टर ? की जणू काय श्री. पुष्पाबाई भाव्याना टी. व्ही. वर कार्यक्रम देणे न देणे त्याच्यात हातात आहे ? आणि क्षणभर समजा, तसे असले, तरी पुष्पाबाईंना टी. व्ही. वर कार्यक्रम मिळत नाही, म्हणून सूडबुद्धीने टी. व्ही. वरचे कोणी फडतूस अधिकारी त्यानी टीकाविषय केले, असे सुचवणे, म्हणजे केवळ अधम मनोवृत्तीचे लक्षण आहे. आता येथे प्रश्न असा आहे की 'कमरेखाली वार' कोण कोणावर करीत आहे ? आणि हे जाताजाता ही अशी 'कमरेखालच्या वारा'ची भाषाही प्रस्तुत सबधात अशिष्टच होय. दिलगिरी व्यक्त करण्याची ही तेढी रीत अजबच म्हणावी लागेल. एकूण काय, तर श्री. पुष्पाबाई भावे यानी श्री. विनय धुमाळे याची गणना 'प्रतिष्ठित प्रेक्षका'त केली, तेच चुकले !

४-१०-७४ माधव मनोहर

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा राहिलाच. मुद्दा हा : श्री. पुष्पा भावे यांनी श्री. विनय धुमाळे यांना व त्याचे जे कोण 'बाष्कळ गोधळ' घालणारे सहभागी असतील त्याना आवाहन केले होते ते अशा 'अगळिकी'बद्दल 'उन्मेष'च्या सचालकाची व 'टिळक मेडिकल' महाविद्यालयाच्या कलावताची माफी मागावी म्हणून. आणि आता कुथत कुथत श्री. धुमाळे माफी मागत आहेत ते पुष्पाबाईंची व त्याच्याप्रमाणेच 'पुढील रागातील ज्या कोणाचा रसभग झाला असेल, त्याची.' जणू काय पुष्पाबाईंनाच धुमाळ्यांची माफी हवी होती ! ही अशी माफी पण शिष्टाचारास सोडून आणि म्हणून गैर आहे. गुन्हा कबूल असेल तर माफी पण कशी लखलखीत स्वच्छ हवी ! □

मुक्काम मुंबई

# एका कर्मयोग्याची महापूजा

भारतकुमार राऊत

शिवाजी पार्क हळू हळू भरत होत. सध्याकाळचे पाच वाजून गेले आणि प्रचड जनसमुदाय सध्याकाळच्या सूर्यप्रकाशात दिसायला लागला. समोरच्या बाजूला एक प्रचड व्यासपीठ उभारण्यात आलं होत. लालभडक पडद्याच्या पार्श्वभूमीवर विळाकणीस युक्त लाल बावटा फडकत होता.

गेल्या अनेक वर्षांत शिवाजी पार्कनं कम्युनिस्ट पक्षाची इतकी प्रचड सभा पाहिली नव्हती. एक काळ त्याचाही होता की, जेव्हा या लाल बावटयान इथं मोठमोठया लढयाच नेतृत्व पत्करल. पण ते दिवस गेले. शिवसेनेची स्थापना झाली आणि लाल बावटा शिवाजी पार्कमधून जवळ जवळ हद्दपार झाला. नतरही त्याच्या थोडयाफार बैठकी-सभा इथ झाल्या पण त्यांच रूप बघवणार नाही इतक केविलवाणं होत.

तर ही कम्युनिस्ट पक्षाच्या 'लाल बावटयाच्या' खाली भरलेली एक विराट सभा. या सभेत कोणत्याही सपाची घोषणा होणार नव्हती. महागाई भत्ता, पगारवाढ, यापैकी कोणतीही मागणी पुकारण्यात येणार नव्हती. कोणत्याही सपाला पाठिंबा देण्याकरता इथं 'मुबई बद'चा आदेश द्यायचा नव्हता. तरीही शिवाजी पार्कात लाल बावटे घेऊन लोकांचे थवेच्या थवे येतच होते

घड्याळाच्या काटयान सहा वाजल्याच दाखवल. अधार पडायला लागला. त्या प्रचड स्टेजवर लाल पडद्यावर मध्यभागी लावलेला कॉम्रेड डांगेचा पचवीस फूट उचीचा फोटो मंद स्मित करीत होता. आज डांग्याचा अमृत महोत्सवी वाढदिवस होता. श्रीपाद अमृत डाग या माणसाला ७५ वर्ष पूर्ण झाली म्हणून हा प्रचड समारोह होणार नव्हता तर डागे या माणसाबरोबरच देशाच्या कामगार चळवळीन एक महत्त्वाचा टप्पा गाठला होता. गेली पन्नास वर्षं देशातली कामगार चळवळ डांग्यानी आपल्याबरोबर वाहून नेली.

कॉ. डागे ७५ वर्षं वयाचा हा माणूस, नेहमीचा वेश – बुशशर्ट, पँट, चप्पल आणि मफलर. पण आज त्यानी काळा बद कोट घातला होता. डोक्याला पुरेस टक्कल पडलेला हा माणूस ७५ वर्षांचा असेल हे कुणालाही खर वाटणार नाही, इतका तरतरीत आहे. स्पष्ट उच्चार, हसतमुख चेहरा आणि तीव्र बुद्धिमत्ता यामुळ डागे वयाच्या नेहमीच मागे राहिले. अडीच वर्षांपूर्वी कुठल्यातरी गिरणी सपात डागे एका गिरणीचा वारा फुटी बद दरवाजा चढून वर गेले आणि आत उतरले. ते दृश्य पहाताना हा म्हातारा केवळ म्हातारा किंवा केवळ नेता नाही हे पक्क जाणवल होत.

तर असे डागे, स्टेजच्या मध्यावर येऊन दाखल झाले आणि सारं मैदान अक्षरशः टाळ्या आणि घोषणांनी दुमदुमून गेल. 'कॉ. डागे चिरायू होवो'च्या घोषणांनी सारा परिसर हादरला. या महान कर्मयोग्याच्या सार्वजनिक हार्दिक पूजेला सुरुवात झाली.

'कॉ. डागे अमृत महोत्सव सत्कार समिती'नं या समारोहाच आयोजन केल होत. डागेच्या एका बाजूला केंद्रीय मत्री यशवतराव चव्हाण आणि दुसऱ्या बाजूला माजी राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी बसले होते. समोर अथांग जनसागरात हजारो गिरणी कामगार आपल्या मुलाबाळांसह हजर होते. भाई डांगे या प्रत्येक गिरणी कामगाराच्या घरातले गेली अनेक वर्षं अविभाज्य घटक बनले आहेत. या प्रत्येक कामगाराच्या कुटुबात कोणताही महत्त्वाचा निर्णय घ्यायचा असला तरी सध्या डागे काय करताहेत ? इतक्यात कुठलाही सप व्हायचा नाही ना, याची चौकशी केली जाते. पण तरीही या डागेबाबाबद्दल तमाम गिरणी कामगारात अमाप आदराची आणि प्रेमाची भावना ओसडत आहे. काही दिवसांपूर्वी मी एका गिरणी कामगाराला चिडवण्याच्या उद्देशान म्हटल की, तुमचे नेते म्हणवणारे डागे, तुम्ही चाळीत खितपत असता आलिशान फ्लॅटमध्ये रहातात, मोटारीतून फिरतात, महिन्यातून एकदा परदेशी जातात, हे कस ? त्यावर चिडून उत्तर मिळाल की, 'त्या महान माणसान आमच्याकरता इतकं केलय की, यापुढे काहीही न करता त्यांनी नुसता आराम केला तरीही आम्ही त्याच्यासाठी सार काही सोसू.'

अमर शेखाच्या पोवाडयाच्या रेकॉर्डस् सपल्यावर ब्लिटस्‌चे आर. के. करजिया उभे राहिले. आपल्या ठसकेदार शैलीत त्यानी प्रास्ताविक भाषण केलं. पुन्हा घोषणा वगैरे. हार तुऱ्याची डांगेच्यावर अक्षरश बरसात. काही दिवसापूर्वी महाराष्ट्राचे सर्वात दीर्घकाळचे मुख्यमत्री वसतराव नाईक याची एकसष्टी साजरी झाली. त्यावेळी षण्मुखानद मध्ये अशीच सभा झाली होती. त्यावेळी नाईकापुढेसुद्धा हारतुऱ्यांचा असाच ढीग झाला. पण तेव्हाची पाढऱ्या टोपीतली कृत्रिम हास्ये, त्याचे घाई घाईचे कॅमेऱ्याकडे बघून केलेले नमस्कार आणि डाग्याना कडकडून भेटणारे आणि पायाना साकड घालणारं भाबड, निर्व्याज प्रेम याची नको नको म्हणताना डोक्यात तुलना होत होती. एक सत्ताधारी, तर एक सत्तेशी झुजणारा. एकाकडे राजदड तर दुसऱ्याकडे जनतेच्या मनाची सत्ता. एकाच्या हाकेन लाखो कामगार एकत्र जमतात तर दुसऱ्याच्या आदेशानं सपासप लाठ्या चालतात. सू सू गोळ्या सुटतात. असो.

कॉ. डागे यांना कामगारांच्या प्रेमाची पावती म्हणून मानपत्र आणि साडेचार लाख रुपयांची थैली देण्यात आली. त्याच्या आत्मचरित्राचा पहिला खड प्रकाशित करण्यात आला. डागेंच्या कार्याचा गौरव करणारी अनेक भाषण होत होती. यशवतराव चव्हाणही डांग्याबद्दल बरंच काही बोलले.

व्ही. व्ही. गिरी हे पूर्वीचे कामगार नेते. नतर उपराष्ट्रपती, राष्ट्रपती वगैरे झाले. १९२६ साली रेल्वे कामगाराची पहिली युनियन बाधणाऱ्या या माणसान गेल्या रेल्वे सपात राष्ट्रपतीपदाच्या खुर्चीत बसून केवळ बघ्याची भूमिका घेतली. ते व्ही. व्ही. गिरी यावेळी बोलले. सपात सरकारची भूमिका चुकीची होती. आता व्हिक्टीमायझेशन नको वगैरे बरंच काही बोलले.

शेवटी डागे सत्काराला उत्तर द्यायला उठले. सव्वापाच फूट उचीच्या या अफाट वक्तृत्व असलेल्या माणसाची अनेक भाषण मी ऐकलीत. लोकसभेतल्या भाषणापासून ते कामगार मैदानातल्या भाषणापर्यंत डांग्याच्या वक्तृत्वाच्या अनेक छटा मी बारकाईन पाहिल्यात. याहीवेळी डागे बोलले. बरचस कृतार्थतेच. बरंचस गोल गोल आणि गोड गोड. सभा चालू असताना मध्येच लाऊड स्पीकर ऑफ झाले मध्येच दिवेही गेले पण सभा हालली नाही. डागे बोलत होते. पण डांग्यांच्या पूर्वीच्या भाषणाचा जोश त्यात नव्हता. डांग्याचं ज्ञानेश्वरीवरच प्रवचन ज्यान ऐकलय त्याला तर हे भाषण बिल्कुल आवडल नसतं.

टाळ्याचा गजर झाला. डागे बसले. हजारोचा जमाव पागला. डागेही मोटारीतून घरी गेले. लाल पडद्यावरचा त्याचा फोटो आणि त्यावरचा 'लाल बावटा' रात्रभर शिवाजी पार्कात राखण करीत जागे होते. ❑

# सोल्झेनित्सिन : प्रश्नचिन्ह

आशय : वसंत लुले  शिल्प : रमेश गुप्ता

कब्रस्तानाचे एक शतक आणखी.
दोन हजार संवत्सरानी साजरे केलेले
मृत्यूचे वाढदिवस,
माणूस एक वर्षात जेवढा वाढतो
तेवढे वाढण्यास
माणसाच्या जातीला शंभर वर्षे लागतात.

जेव्हा या जातीने
माणूस व आकाश या दोन बापाचा
वारसा सांगणाऱ्या अक्करमाशास
जातीबाहेर काढून
एखाद्या फुलपाखरास टोचून मारावे
तसे मजेमजेत सुळावर ठोकून मारले
तेव्हा पासून तशी फक्त एकोणीस वर्षे
तर उलटली आहेत.

या शतकाच्या चढणीवरील
दोन जागतिक कब्रस्ताने तुडवीत
संस्कृतीचे पौगंड ओलाडून आले आहे
अजून एक डोंगरमाथा.

जेथून भुकेची खाई बरीच मागे
पडली आहे.
जेथे अंगावरील मुबलक वस्त्रानी
गारठा रोखून धरला आहे
आणि प्रत्येकासाठी जेथे पुरेशी
मोकळी जागा आहे.
आणि तरीही...

आणि तरीही तेथे गुदमरत आहेत श्वास
व रोधले गेले आहेत कंठ.
जाणिवाचे एक सपाट पठार
गोलार्धभर पसरले आहे.

जेथून अंतराळाशी केवळ नजरानजर नव्हे
तर हस्तादोलनही करता येते

त्या तेथे ऊर फाटल्या सारखा धपापत
तो उभा राहिला.

आणि रक्तातील शिल्लक प्राणवायूची
सर्व शक्ती एकवटून त्याने खोवले
एक रक्तांधारातही चमकणारे प्रश्ननिशाण !

बिनपखाचे देवदूत
असेच येतात फडकवीत प्रश्ननिशाण !
आणि दणाणतात धाबी प्रस्थापित उत्तरांची

मृतांची शहरे जागी करण्याचा
आगंतुकास हक्क काय ?

या द्रोह्यांस कैद्यांच्या बिगारी छावण्यात पाठवा
अथवा निर्जन द्वीपसमूहात बंदिस्त करा.
अथवा डांबा मनोरुग्णालयात
किंवा कॅन्सरवार्ड हेच त्यांचे विश्रामधाम असो.
अथवा तोडून फेका त्यांची पाळेमुळे
येथील जमिनीत जखडलेली
फक्त जिवे मारू नका !
जागतिक लोकमताची पर्वा करण्याएवढे
आपण निश्चितच सभ्य आहोत.

हे गांडूळ प्रखर सूर्यप्रकाशात
आपले आपण जिरून व मरून जाईल.
भांडवलशाहीचा सडका भुसा भरलेला
हा व्यक्तिवादी वेडपट
समाजसत्तेच्या गनिमाचे उघड नेतृत्व
करीत आहे.

तो घृणेचा नव्हे, तर दयेचा विषय आहे
मानवतावादाच्या नावे त्याच्यावर दया दाखवा.
त्याला सहकुटुंब तडीपार करा
आपण स्वतः निवडलेल्या नरकात
तो सुखे नांदो असो.

पण जाणिवाच्या सर्वोच्च पठारावर
खोवलेले त्याचे प्रश्न निशाण
उखडून फेकणारे प्रस्थापिताचे हात
अजून राज्यसत्ताक कारखान्यात
घडवले जावयाचे आहेत.

आणि असेही शक्य आहे की
हद्दपार झालेला तो
गांडुळासारखा चिखलावेगळा
सूर्याखाली वाळून जाण्याऐवजी
पुन्हा एखाद्या ग्रंथालयात बसून
पश्चात्तप्त मनाने पण थंड डोक्याने
लिहून काढू शकेल
'दास कॅपिटल'चा एखादा
सवाई अँटीडोट
फक्त एवढेच की तो आता
उपाशी असणार नाही
आणि त्याचे मूल औषधावाचून मरण्याची
जरुरी आता राहिलेली नाही.

हौतात्म्यांच्या शक्यता संपलेल्या नाहीत
पण त्यांची अनिवार्यता इतिहासजमा झालेली आहे.

कारण पठारावरील वधस्तंभावरून
पुन्हा पायथ्याशी परतलेले
पुनरुत्थान
हे तसे अदृश्यच असते ईथरसारखे
आणि तरीही अणुगर्भासारखे सघन व सर्वव्यापी
ते तुमच्या ' वर्गीय अनुभूती 'तून
व विरोधविकासवादी घटपटाच्या चर्चेतून
निघणाऱ्या ठाम निष्कर्षांच्या
दुर्योधनी आवाक्यात मावणारे नसते.

तुम्ही करा कितीही
प्रत्यय संपन्न पठडीतील
समर्थनांची कावकाव
तुमचे कोरीव कातीव कांगावे
तुम्हास लखलाभ असोत.
तुम्ही खोडून काढा त्या अदृश्य
झंझावाताचा एक एक ठसा
तुमच्या अस्ताव्यस्त वालुका विस्तारावर
गच्च उमटलेला
आपल्या खबीर उफराट्या पावलांनी
पुसून टाका त्या ' व्यक्ती ' नामक
एकाकी चक्री वादळाच्या पाऊलखुणा !

अरे, पण हा तर तोच तो
सनातन हद्दपार, सीमातीत !
नुसता वाट दाखवणारा नव्हे
तर वाट घडवणाराही
नुसताच द्रष्टा नव्हे तर स्रष्टाही
जो पुन्हा येऊ शकेल फडकवीत प्रश्नचिन्हाण
तुम्हा तमाम दरकदारास नाकारीत
व पोलादी बर्फाचे पडदे टर्कावीत
अखेर एक हद्दपार ' इस्क्राच ' वणवा होऊन
गतेतिहासातून वर्तमानात परत येत नाही काय ?
तेव्हा क्रांतीचे सुकाणू त्याच खिळे ठोकलेल्या
हाताची वाट पाहात असेल.
अथवा असेल तेथूनच आत्म्यातील कळ दाबून
तो प्रक्षेपित करू शकेल
मनामनात भूमिगत असलेली क्षेपणास्त्रे
तेव्हा, बापहो तुम्ही कोठे असाल ?

तो येईल व पुन्हा गर्जून सांगेल
की ही एक मृत व्यवस्था आहे.
व तिच्यासाठी लढणे निरर्थक आहे.
तुमचा ' सूर्य काळोख ' कदाचित
तेव्हा तारसप्तकात कांगावा करील
व त्याला फितूर ठरवील व म्हणेल की :
याचे ऐकू नका !
बहाद्दर सर्वहारा हुकूमशाहीने
उभे केलेले समाजवादी स्वर्गराज्य रक्षण करण्यासाठी
लढा !
तुम्ही लिहीत असाल तेव्हा संग्रामगीते व विकासकवने
राज्य पारितोषकावर नजर ठेऊन.

काळोखाच्या संदर्भात काजव्यांचाही एकाधिकार
सर्वमान्य ठरतो.
फक्त इतराचे वर्गसंदर्भ तपासण्याचा एकाधिकार
तुम्ही किती चलाखीने हस्तगत करून असता
हे जनता वाद्यानो ;
तुमची ही ' अमर जनता '
केवळ मरणे व मारणे या साठीच वापरली
जाण्याचा काळ या शतकाच्या उत्तरार्धात
संपणार आहे.

कारण जगात असे खूप काही घडत आहे.
ह्या जनतेच्याच अमरत्वासाठी
कुठे कुठे जन्मत आहेत
अशी भाल्याच्या टोकासारखी माणसे
आणि अशा पिढ्या, रेडीमेड लेबले धुडकावणाऱ्या
आणि देश : सहन करण्याचे अनंत सामर्थ्य
संपलेले
त्याचे अणुस्फोट व तुमची अंतराळयाने
समीकरणाप्रमाणे होऊन येताहेत
अनंत उत्तराचे पख फडफडवीत
तेव्हा हे प्रश्न निशाण फडकवणाऱ्या
त्या एकाकी व्यक्तीचे श्रेय
याच आयुष्यात त्याना मिळू द्या.

आणि जेव्हा असे होईल
की मृत्यूचा संदर्भच जगातून नाहीसा होईल
आणि गरजांच्या गुलामीचा.
तेव्हा जे प्रसन्न जन्म क्षेपावत येतील
त्याचे डोहाळे लागलेली जमीन
खुद्द तुमच्या पायाखालीच नाही काय, मित्रहो ?

पण तुम्ही करटे असे क्षितिजापल्याड
पहाता, आत्मकुंठीत
आपल्या पायाखालची मक्का लाथाडून
झोपेत चालल्यासारखे दररोज
निघत असता कुठल्यातरी हजयात्रेवर

एका, फक्त एका ' व्यक्ती 'च्या जिद्दीने
खांद्यावर वाहून आणलेल्या
या प्रश्न पताकेचे आव्हान
इतिहास तुम्हाला डावलू देणार नाही.
आणि तिचे आश्वासन आम्हाला येथे तेथे
जगाच्या पाठीवर कोठेही पुरेसे आहे
ते असे की :
आश्चर्याचे दिवस कधीच संपत नसतात.
आणि भाल्याचे टोक होणाऱ्यास
आता अडवू शकणार नाहीत

अंधाराचे केवढेही थरावर थर
आणि मृतप्राय सूर्याच्या म्हाताऱ्या कक्षा. □

# विल्सन
## विजयानंतरचे आव्हान
### वा. दा. रानडे

ब्रिटनमध्ये सात महिन्यांनी झालेल्या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकात हेरॉल्ड विल्सन याच्या नेतृत्वाखालील मजूर पक्षाला बहुमत मिळाले तरी ते फार अल्प असेल हा अदाज खरा ठरला. विल्सन याच्या पक्षाला अवघ्या तीन जागाचे बहुमत मिळाले आहे. पण तीन जागाचे बहुमत म्हणून अस्थिरता वाटण्याचे कारण नाही. आपल्यासारखे सधिसाधू आयाराम-गयाराम इग्लडमध्ये नाहीत. मजूर पक्षातील काही सभासद फुटल्याने आपले बहुमत गमावेल किंवा महत्त्वाच्या विलावरील मतदानाच्या वेळी ते हजर न राहिल्याने आपला पराभव होईल अशी भीती विल्सन याना वाटत नाही. थोडे का होईना पण निर्णायक बहुमत मिळाल्याने आपला कार्यक्रम आता अमलात आणण्याच्या मार्गास ते लागतील.

या निवडणुकीत सर्वात महत्त्वाचा प्रश्न चलनवाढीचा होता. वर्षाला १६·९ टक्के या वेगाने चलनवाढ झालेली आहे. तिला आळा घालण्यासाठी २,४०,००० पौंडापेक्षा अधिक सपत्ती कर, सपत्तीची फेरवाटणी, कामगारानी स्वेच्छेने पगारवाढ रोखणे हे उपाय मजूरपक्षाच्या जाहीरनाम्यात सुचविलेले आहेत. 'दुसऱ्या महायुद्धानतरचा सर्वात गभीर राष्ट्रीय पेचप्रसग.' असे राष्ट्रापुढील पेचप्रसगाचे वर्णन विल्सन यांनी केले पण त्यातून देश पार पडेल असा विश्वास त्यानी व्यक्त केला. प्रमुख उद्योगधद्याचे राष्ट्रीकरण आणि ब्रिटनने समाईक बाजारपेठेत रहावयाचे की नाही यावर एक वर्षाच्या आत सार्वमत या कार्यक्रमाचाही मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यात समावेश आहे.

विल्सन यानी निवडणूक जिकली खरी पण चलनवाढीचा प्रश्न ते कितपत यशस्वीपणे सोडवू शकतात यावरच त्यांच्या सरकारचे यश अवलबून राहील. चलनवाढ हा आता एकटद्या दुकटद्या राष्ट्राचा प्रश्न राहिलेला नसून ती जागतिक समस्या झालेली आहे. ब्रिटिश मजूर पक्षासारख्या लोकशाही समाजवादी पक्षांना तर ते मोठे आव्हान आहे. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या पहिल्याच निवडणुकीत १९४५ साली ब्रिटनमध्ये मजूर सरकार मोठ्या बहुमताने अधिकारावर आले. तेव्हापासून त्या पक्षाच्या नेत्यानी जी सामाजिक व राजकीय पद्धती अस्तित्वात आणली ती मध्यतरी काही काळ हुजुराच्या हाती सत्ता गेली व ती फारसे बदल न होता कायम राहिली. लोकशाही मार्गाने आणता येईल तेवढा समाजवाद आणणे, स्वातत्र्य आणि समता या दोन्ही मूल्याना सारखेच महत्त्व देणे ही या पद्धतीमागील मुख्य वैचारिक बैठक. पण आर्थिक पेचप्रसगावर विल्सन सरकार मात करू शकले नाही तर त्यातून केवळ मजूरसरकारच नव्हे तर त्यानी १९४५ पासून अस्तित्वात आणलेली लोकशाही समाजवादी पद्धती धोक्यात येईल असे ब्रिटनमधील राजकीय विचारवतांना वाटते. निवडणुकांच्या आधी दोन दिवस ८ ऑक्टोबरच्या अकातील अग्रलेखात 'लडन टाइम्स'ने ही शका प्रदर्शित केली आहे. या पत्राच्या मते 'या पद्धतीत कामगार संघटनांना प्रमाणाबाहेर महत्त्व प्राप्त झालेले आहे. या पद्धतीतील दुसरा दोष म्हणजे कराच्या मोठ्या प्रमाणामुळे बचत तर कमी होतेच पण काम करण्यास आणि भाडवल गुतवणुकीस आवश्यक असलेले प्रलोभनच कमी होते. ही पद्धती भांडवलदारी स्वरुपाची आहे. पण तिच्यात भाडवलशाहीचे फायदे व शिस्त नाही. तसेच ती समाजवादी स्वरुपाची आहे पण तिच्यात समाजवादाची शिस्त नाही.' अशा शब्दात लोकशाही समाजवादी पद्धतीतील दोषाचे मार्मिक विश्लेषण या लेखात केले आहे. सध्याच्या पद्धतीत चलनवाढीवर यशस्वी तोडगा नाही. त्यासाठी आपणास एकतर समाजवादाकडे अधिक झुकावे लागेल किंवा भाडवलशाहीकडे अधिक झुकावे लागेल असे त्यात सूचित केले असून दुसऱ्या मार्गाबद्दल म्हणजेच भाडवलशाहीकडे अधिक झुकण्याचा मार्गाबद्दल अनुकूलता दर्शविली आहे. पूर्ण रोजगार, कामगार सघटनानी आपल्या मागण्यांसाठी खुल्या सामुदायिक वाटाघाटी करणे, खुल्या निवडणुका आणि स्थिर किंमती हा चौकोन हा अॅटली यानी स्थापन केलेल्या पद्धतीचा आधार होता. पण त्याचे एकेक कोन ढासळून ही पद्धती मोडण्याच्या बेतात आहे असा इशारा या लेखात दिला आहे.

ब्रिटिश मजूर पक्षाच्या समाजवादावर कामगार सघटनाचा प्रभाव आहे. 'न्यू स्टेटसमन'च्या २० सप्टेंबरच्या अकातील लेखात पीटर जेंकिन्स यांनी म्हटल्याप्रमाणे 'या कामगार सघटनांना भाडवलशाहीरूपी हंसी नष्ट करावयाची नाही पण तिची सोन्याची अंडी मात्र खावयाची आहेत.' जॉर्ज लिक्थेम यांनी 'ए शॉर्ट हिस्टरी ऑफ सोशॅलिझम' या आपल्या पुस्तकात समाजवादी चळवळीपुढील समस्याचे विश्लेषण करताना जवळचे उद्देश आणि दूरचे उद्देश यातील तोल या चळवळीच्या नेत्याना बरोबर साधता आलेला नाही असे मत व्यक्त केले आहे.

बहुसंख्य मतदार कामगार असल्याने त्यांची पगारवाढ, त्याना नित्योपयोगी वस्तू अधिक प्रमाणात उपलब्ध करून देणे या गोष्टीनाच अधिक महत्त्व दिले जाते. सामाजिक समतेच्या दृष्टीने हाती घ्यावयाच्या दूरच्या उद्दिष्टाचा कार्यक्रम दूरच रहातो. त्याला कामगारवर्गाकडूनच विरोध होतो. अशी त्यांची टीका आहे. लोकशाही समाजवादी चळवळीच्या भवितव्याचे दृष्टीने या विचारवतांनी उपस्थित केलेले प्रश्न महत्त्वाचे आहेत. त्याचा अधिक विचार होणे आवश्यक आहे.

ब्रिटिश मजूर पक्षाने ज्या जास्त जागा यावेळी जिकल्या, त्या बहुतेक सर्व हुजुरांच्या जिकल्या. हुजूरांचे पक्षपळ गेल्या फेब्रुवारीत २९६ होते ते २७६ पर्यंत घटले. एका पक्षाचे सरकार की राष्ट्रीय सरकार या प्रश्नावर हुजूर पक्षाचे नेते हीथ यांनी निवडणुकीत भर दिला. 'राष्ट्रीय ऐक्याचे सरकार' असे शब्द त्यांनी वापरले तरी त्यांना हुजूर आणि लिबरल यांचे सयुक्त सरकारच अभिप्रेत होते. त्याच्या या भूमिकेस 'लडन टाइम्स' 'इकनॉमिस्ट' या पत्रांनी आपल्या लेखातून पाठिंबा दर्शविला होता. पण मतदाराना भिन्न धोरणे असलेल्या पक्षाच्या सयुक्त सरकारपेक्षा निश्चित कार्यक्रमावर उभे असलेले एका पक्षाचे सरकार अधिकारावर येणेच हिताचे आहे असे वाटले व त्यांनी मजूर पक्षाच्या बाजूने कौल दिला. आपण यावेळी जास्त जागा मिळवू ही लिबरल पक्षाची अपेक्षाही चुकीची ठरली. त्यांना चार जागा गेल्या वेळेपेक्षा कमीच मिळाल्या.

विल्सन यानी निवडणुका जिकल्या पण चलनवाढीचा पेचप्रसंग ते कसा सोडवितात यावरच त्याच्या नेतृत्वाची आणि ब्रिटिश समाजवादाचीही खरी कसोटी लागणार आहे. □

# दोन ऑक्टोबर
# मुक्काम नायगाव

अनिल काळे, ग्रामायन

दोन ऑक्टोबर कार्यक्रम होता पुरदर तालुक्यातील नायगाव या खेड्याला भेट देऊन ग्राम गौरव प्रतिष्ठानने तिथे सुरू केलेले काम पाहण्याचा, सयोजकांच्या पुढील योजना समजावून घेण्याचा. सयोजकानी ग्रामीण विकासाशी सबधित अशा क्षेत्रातील सुमारे पन्नास-एक तज्ञ व मान्यवर व्यक्तीना या कार्यक्रमासाठी निमंत्रित केले होते. यात प्रामुख्याने बँक ऑफ महाराष्ट्र व काही अन्य बँकाच्या अधिकाऱ्यांचा समावेश होता. याशिवाय काही अनुभवी शेतकरी, जि. प. अधिकारी, औद्योगिक सल्लागार, छोटे उद्योजक, व्हेटर्नरी सर्जन्स, एक जलशोधक आणि काही तरुण उत्साही कार्यकर्ते अशीही मडळी यात होती. अर्थातच या सर्व पाहुण्याचे धुरिणत्व होते आपल्या व्यापातून सपूर्ण दिवसाचा वेळ काढून आलेले बँक ऑफ महाराष्ट्रचे प्रमुख श्री. व्ही. एम्. भिडे याच्याकडे.

खास एस. टी ने जाण्या-येण्याची सर्वांची व्यवस्था करण्यात आली होती. जाताना Rural Development Scheme of Gram Gourav Pratishthan असे एक माहितीपत्रक सर्वांना देण्यात आले.

१९७२–७३ च्या दुष्काळात Forum of Industrial Technologists ने दुष्काळी पुरदर तालुक्यातील शेतमजुराना पर्यायी रोजगार उपलब्ध करून देणे व पाझर तलाव, नाला बडिंग इ. च्या सहाय्याने पुरदर तालुक्यातील पाणी पुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी मदत करणे या हेतूने एक पहाणीचा कार्यक्रम हाती घतला. यासाठी पुणे औद्योगिक परिसरातील काही कारखाने व सस्था यानी FTT ला आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले. पाहणी करून ३० लाख रु. अंदाजी खर्चाची १७ पाझर तलाव व ७ नाला बडिंगची कामे याची योजना तयार करण्यात आली. तेव्हा पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी आर्थिक व Church's Auxiliary for Social Action' या सस्थेने food for work या त्याच्या योजनेद्वारा गहू व तेल या स्वरूपात मदत उपलब्ध करून दिली.

या सर्व योजनेतून FTT ने दुग्ध-शेतीवर आधारीत एकात्म ग्राम विकासाचा कार्यक्रम डोळ्यापुढे ठेवला व तो कार्यवाहीत आणण्यासाठी 'ग्राम गौरव प्रतिष्ठान' या विश्वस्त निधीची स्थापना केली. श्री. जी. बी. नेवाळकर, डॉ. एम्. डी. साठे आणि व्ही. बी. साळुके हे प्रतिष्ठानचे मॅनेजिंग ट्रस्टी आहेत.

ही ग्राम गौरव प्रतिष्ठानची पार्श्वभूमी या पत्रकातून आमच्या निदर्शनास आली व सोबत दिलेल्या अभ्यासपूर्ण आकडेवारीवरून प्रतिष्ठानच्या महत्त्वाकांक्षी भावी योजनांचीही कल्पना आली. मिश्रजातीच्या ५० गायी आणून, त्यातील काही, परिसरातील शेतकऱ्यांना जोपासनेसाठी देऊन क्रॉस-ब्रीडिंगचे तत्र व दुग्धव्यवसायाची अन्यही तांत्रिक अगे शेतकऱ्याना शिकविणे आणि त्याना अशा प्रकारच्या आधुनिक तत्राच्या दुग्धव्यवसायातून त्यांची आर्थिक उन्नती साधणे हा प्रतिष्ठानचा प्रमुख कार्यक्रम आहे.

एकमेकाचा परिचय करून घेत व ग्रामीण विकासावर मुक्तपणे विचारझोड करीत साडेदहा वाजता आम्ही नायगावला पोचलो. वाटेत एका ठिकाणी FTT च्या तांत्रिक सहकार्याने करण्यात आलेले नाला-बडिंगचे काम आम्हाला दाखविण्यात आले. यावेळी जि. प. अधिकारी व काही कार्यकर्ते या अशा कामाची, बाधून पूर्ण झाल्यावर नेहेमीसाठी, व्यवस्था कुणी ठेवायची यावर थोडासा वाद झाला. त्या त्या कामाचा फायदा मिळणाऱ्या शेतकऱ्यानीच एकत्र येऊन ही जबाबदारी घेतली पाहिजे असा 'सरकारी' दावा होता तर आपल्याकडे एवढी सामाजिक जाणीव व एकोपा नसल्यामुळे सरकारनेच याकडे लक्ष ठेवले पाहिजे अशी दुसरी बाजू होती.

पाऊस भरपूर झाला असल्याने मातीच्या कच्च्या रस्त्यांवरूनही कुठेही ओढघा-चिखलात एस. टी. न रुतता आम्ही नायगावला पोहोचलो हीच कार्यक्रमाची यशस्वी सुरुवात होती.

> ### आदिवासी कार्यकर्त्यांसाठी ग्रामायन पुस्तिका
>
> आदिवासीच्या जमिनीचे बिगर आदिवासीकडे हस्तातर होऊ नये, तसेच बेकायदा हस्तातर झालेल्या जमिनी त्याना परत मिळाव्यात यासाठी महाराष्ट्र सरकारने ६ जुलै १९७४ रोजी एक वटहुकूम काढला. यात काही सुधारणा करून त्यासंबंधीचे विधेयक विधानसभेत ऑगस्ट महिन्यात समत झाले. या विधेयकाची आदिवासी समाजात कार्य करणाऱ्या सर्वांना माहिती व्हावी या दृष्टीने ग्रामायनतर्फे एक पुस्तिका प्रकाशित करण्यात आली आहे. तिची किंमत ७५ पैसे ठेवण्यात आली असून ग्रामायनकडे विचारणा केल्यास ही पुस्तिका मिळू शकेल.

प्रतिष्ठानच्या फार्मवर प्रतिष्ठानचे प्रशस्त विश्रातीगृह नुकतेच बांधून पुरे झालेले दिसले. सौ. साळुके यानी हुलग्याचे गरम गरम 'माडग' हे चवदार पेय देऊन सर्वांचे स्वागत केले. सौ. साळुके B. Sc. झालेल्या असून प्रतिष्ठानच्या ४०–४२ एकर शेताची सपूर्ण व्यवस्था पाहण्यासाठी नायगावलाच जाऊन राहिल्या आहेत. प्रथम श्री. साळुंके साहेबानी त्याची व तिथेच राहणाऱ्या त्याच्या अन्य सहकाऱ्याची पाहुण्याशी ओळख करून दिली. याचवेळी स्वागतासाठी आलेले नायगावचे तरुण सरपच, जि. प. सदस्य, ग्रामसेवक व काही प्रगतीशील शेतकरी यांचीही ओळख करून देण्यात आली.

पोचण्यास थोडासा उशीर झाला असल्यामुळे कार्यक्रमपत्रिकेवरील श्रमदानाचा कार्यक्रम रद्द करण्यात येतो की काय अशी सुखसवेदक भीती काही पाहुण्याना वाटत होती. परतु तसे झाले नाही. दोन तासांऐवजी पाऊण-एक तास फार्मच्या नियोजित गोठ्याचा पाया खणण्यासाठी श्रमदान करण्यात आले. शहरी मंडळीचा हा कार्यक्रम पहाण्यासाठी

टॉलस्टाय
एक माणूस

सुमती देवस्थळे

मूल्य २५ रुपये

राजहंस प्रकाशन
पुणे ३०

मोठ्या सख्येने गावकरी मंडळी बांधावरती बसली होती. आणि कार्यक्रम त्यांच्या अपेक्षे-प्रमाणेच 'यशस्वी' झाला. पाहुण्यांच्या दुर्दैवाने पावसामुळे माती गच्च झाली होती. साहजिकच खणून बाजूला टाकलेल्या मातीचा बांध फारच थोड्या उचीचा झाला,

श्रमदानानतर शेताच्या पहाणीस सुरुवात झाली. श्री. साळुके व त्यांचे सहकारी ज्वारी, बाजरी व गवताच्या वेगवेगळया जातीच्या केलेल्या प्रायोगिक लागवडीची माहिती देत होते. दुग्धव्यवसाय हे प्रमुख उद्दिष्ट असल्याने गवताच्या चांगल्या जातीच्या पैदाशीवर विशेष लक्ष देण्यात आलेले दिसून आले. शेताच्या उताराच्या खडकाळ जमिनीत दोन हजार झाडाची लागवड करण्यात आली आहे. यदा झालेला चागला पाऊस व काळजीपूर्वक देखभाल यामुळे यातील बहुतेक सर्व झाडे चागली जगली आहेत. सिसीलाना या परदेशी जातीचे २००० कद मोठ्या प्रयासाने मिळविण्यात येऊन त्यांचीही लागवड करण्यात आली आहे. ७२ च्या दुष्काळात बांधण्यात आलेला पाझरतलावही दाखविण्यात आला व परिसरातील तीन नाल्याचे पाणी अडवून पाझर तलावात सोडण्याची आणि प्रमुख नाल्यावर एक छोटा बधारा घालण्याची योजनाही प्रत्यक्ष जागेवर नेऊन पाहुण्यांना समजावून सागण्यात आली.

श्रमदानानतर लगेच एवढे मोठे फार्म हिंडून पहाण्यात पाहुण्यानी चांगलाच उत्साह दाखविला होता. त्यानतर जेवण होऊन सर्व निमंत्रित व ग्रामस्थ याची छोटीशी सभा सुरू झाली. प्रथम श्री. व सौ. साळुके यांच्या सहकाऱ्यानी आपापल्याकडे असलेल्या विभागाची थोडक्यात व मुद्देसूद माहिती दिली. आतापर्यंतच्या पहाणीत साळुके दापत्याच्या सघटना कौशल्याविषयी आम्हाला कल्पना आली होतीच, पण त्याच्या सहकाऱ्याच्या व त्याना सहकार्य करणाऱ्या सरपच, जि. प. सदस्य याचीही भाषणे ऐकून ती कल्पना अधिकच दृढ झाली. निमत्रितापैकी काही महत्त्वाच्या व्यक्तीनीही आपले विचार मांडले.

या भाषणामधून अनेक गोष्टी समजल्या. 'ग्राम गौरव प्रतिष्ठान'ला बँक ऑफ महाराष्ट्रकडून अपेक्षित असलेले दोन अडीच लाखाचे कर्ज मिळण्याची ग्वाही याच वेळी त्यांना बँकेच्या अधिकाऱ्याच्या भाषणातून मिळाली. श्री. भिडे साहेबानी अशा स्वरुपाची, परिसरातील शेतकऱ्याना सतत मार्गदर्शन व सहाय्य करणारी, आदर्श शेते (model farms) अनेक ठिकाणी निर्माण झाली तर बँकाना गरिबात गरीब शेतकऱ्यांनाही कर्ज देणे सोपे होईल असे मत व्यक्त केले.

आजूबाजूचे शेतकरी, सरपच, ग्रामसेवक इ. मडळी व प्रतिष्ठानचे कार्यकर्ते दर शनिवारी एकत्र येऊन विचार-विनिमय करतात व बी-बियाणे, खते मिळविणे, शेतमालाची विक्री करणे, प्रतिष्ठानच्या पुढील योजनांची कार्यवाही करणे इ. विषयी निर्णय घेतात ही गोष्ट फार महत्त्वाची वाटली. कारण ग्रामविकासाचे कुठलेही काम यशस्वी व्हायचे असेल तर स्थानिक लोकाचे सहकार्य व पुढाकार या गोष्टी अत्यत महत्त्वाच्या असतात. काम जरी गावकऱ्याच्या हिताचे असले तरीही सर्वच ठिकाणी अशा कामाला त्याचे सहकार्य मिळते असे नाही. म्हणूनच नायगाव ग्रामस्थाचे सहकार्य मिळविण्यात यशस्वी झालेले साळुके पतिपत्नीचे मनापासून अभिनदन करावेसे वाटते.

परिसरातील शेतकऱ्याना मार्गदर्शक ठरेल असे एक आदर्श शेत व आदर्श दुग्धव्यवसाय उभारण्याचे 'ग्राम गौरव प्रतिष्ठान'चे हे जिद्दीचे प्रयत्न यशस्वी होतील याची पदचिन्हे या गाधी जयतीनिमित्त योजलेल्या कार्यक्रमातून सुस्पष्ट झाली. महात्मा गाधीच्या भारताच्या आर्थिक प्रगतीविषयीच्या तत्त्वज्ञानाचे मर्म जाणून काम करणारा हा प्रकल्प नक्कीच एक नमुनेदार प्रकल्प होईल.

□

हैदराबाद मुक्तिसंग्रामातील आणखी दोन अज्ञात कथा

# परमवीर हळंबरे नागण्णा

अशोक परळीकर, परभणी

हिसामोद्दीनला, भाऊराव पाटलानी मारला ही वार्ता वणव्याप्रमाणे रझाकार जगतात पसरली. (माणूस, १२ ऑक्टोबर अक) रझाकारानी भाऊराव आणि त्याच्या साथीदाराचा कसून शोध घेण्यास प्रारभ केला. भाऊरावांची कातडी सोलून, त्याला हालहाल करून मारून हिसामोद्दीनच्या वधाचा ते 'इन्तेकाम' घेऊ इच्छित होते. भाऊराव पाटलाचे वर्णन गावोगावच्या रझाकाराना कळविण्यात आले. आणि भाऊराव दिसताच त्याला कैद करण्याची (शक्यतो आणि नच जमल्यास गोळी घालण्याची) आज्ञा प्रसृत करण्यात आली. भाऊराव पाटलानी हिसामोद्दीनला मारून होनल्ली प्रकरणाचा सूड घेतला ही बातमी सगळीकडे पसरली होती. रझाकारानी भाऊरावासाठी सापळा लावला परतु भाऊराव केव्हाच निसटला होता. भारतीय हद्दीत तो सुरक्षित पोचला होता. भाऊरावाचा शोध लावण्यासाठी रझाकारानी अनेक प्रकार केले. भाऊरावांचा ठावठिकाणा सागावा म्हणून हिंदूवर अनत अत्याचार केले. आजूबाजूचे हिंदू ग्रामस्थ भयभीत झाले. केव्हा कोणता प्रसग त्याच्यावर येईल याचा नेम नव्हता.

भाऊराव पाटील मिळण्याची शक्यता दुरावली तेव्हा त्याला अज्ञातवासात ज्यानी ज्यानी सहाय्य केले त्यांच्याकडे रझाकारानी मोर्चा वळविला. मुचलमच्या शरणप्पा पाटलाने भाऊरावला काही दिवस आश्रय दिल्याचे वर्तमान त्याना कळाले. तेथे राहूनच तो हिसामोद्दीनच्या हालचालीवर बारीक लक्ष ठेवून होता. असे त्याना समजले आणि मग भाऊराव नाही तर नाही, त्याच्या आश्रयदात्याना हिसका दाखवू म्हणून रझाकारांनी आपला रोख त्या लोकांकडे वळविला.

एके दिवशी अचानक रझाकारांनी मुचलमवर धाड घातली. दीन–दीन आणि गोळीबाराच्या आवाजाने दशदिशा दणाणून गेल्या. ग्रामवासी हिंदू भयभीत झाले सर्वांनी एकत्र यावयाच्या ऐवजी ज्यानी त्यानी आपापल्या घराचे दरवाजे बद केले बाहेर पडण्याची कोणाचीही प्राज्ञा नव्हती. लोकाना भिवविण्यासाठी सतत गोळीबार चालू होता. शरणप्पा पाटलाच्या कानावर हा आवाज पोचला तेव्हा तो कुटुबासमवेत जेवण करीत होता. त्याने घाईघाईने हात धुतले आणि हिंदूना, रझाकाराशी सामना देण्यासाठी, एकत्र येण्यासाठी आवाहन करू लागला. त्याने पाहिले, भयभीत हिंदूनी आपापले दरवाजे बद केले होते. शरणप्पा असहाय्यपणे ओरडत होता. त्याची ट्वेल्व्ह बोअर त्याच्या भावाने नेली होती. त्यामुळे त्याच्याकडे शस्त्रच नव्हते. रझाकारांच्या एका विशेष तुकडीने शरणप्पाच्या घराला वेढा दिला. शरणप्पाकडून प्रतिकार होईल असे त्याना वाटले परतु काहीच हालचाल दिसेना. शरणप्पाच्या घराला त्यानी धडका दिल्या. शरणप्पाचे रक्त उसळत होते पण तो शस्त्रहीन होता. महाभारतीय युद्धातील कर्णासारखी त्याची अवस्था होती. स्वत:च्या असहाय्यतेने तो पेटून उठला. घरातल्या घरात तो अस्वस्थतेने फेऱ्या घालू लागला. काय करावे? कसे लढावे? त्याचे डोके भणाणून गेले. बाहेर रझाकारांनी खात्री करून घेतली की हा शेर आपल्या कुटुबियासह आत आहे. बस्स! मग काय? त्यांनी घराच्या चारी भिंतीवर रॉकेल आणि पेट्रोल टाकले आणि 'काडी' लावली. उन्हाळयाचे दिवस होते. पहाता पहाता अग्नीने रौद्र स्वरूप धारण केले. ते पूर्ण घर अग्नीने वेढले, ज्वाला गगनाला भिडल्या. आणि ते घर शरणप्पा पाटील, त्याची पत्नी आणि दोन मुले यासह भस्मसात झाले. अग्नीचा असा थयथयाट चालू असता शरणप्पाची काय अवस्था असावी? शिकाऱ्यानी चौफेर वेढलेल्या असहाय्य आणि दुर्दैवी हरणापेक्षा त्याची अवस्था काय वेगळी असणार? मरणाच्या भीतीने बाहेर पडून मुलाबायकोवर नको तो प्रसग आणण्यापेक्षा तो कुटुबियासमवेत हसत मरणाला सामोरा गेला असावा. आपल्या असहाय्यतेचे केवढे प्रचड दु:ख त्याला वाटले असावे? त्याने पत्करलेले मरण अत्यत धीरोदात्त होते. अग्नीने घराला लपेटले तेव्हा रझाकार खदखदा हसत होते. आपल्या या 'नरमेधा'त पाटलाचा निर्वंश झाला असे त्याना वाटले. पाटलाचे घर जाळून झाल्यावर रझाकारानी अन्य हिंदूच्या घराकडे मोर्चा वळविला. मुचलम लुटण्यात आले. आणि हिंदूवर पाशवी अत्याचार करण्यात आले.

'मुचलम'च्या नरमेधाने त्या राक्षसी रझाकाराचे समाधान झाले नाही. आता त्यानी आपला मोर्चा 'गोर्टा' या गावाकडे वळविला. रझाकारांना 'गोटर्याबद्दल विशेष आकर्षण होते. १९२८ मधील दगलीत तेथील मुसलमानानी हिंदूवर अतोनात अत्याचार केले होते. स्त्रियाची अब्रू लुटणे, गाय बैलाना रस्त्यावर कापणे, लुटमार करणे, खून पाडणे असे त्या अन्यायाचे बहुविध स्वरूप होते. त्यावेळी साधारणत: दोनशे सैनिक आणि पाचशे मुसलमान या गुडगिरीत सामील होते आणि दगल माजविल्याबद्दल गावातील तगडया तरुण हिंदूना न्यायालयात खेचण्यात आले. या तरुणापैकी ३२ जणाना अपराधी ठरवून शिक्षा ठोठावण्यात आली. गाव अशा रीतीने निष्कटक झाल्यानतर पुन्हा बलात्कार, खून, लूटमार आणि अन्य

अत्याचारांची पुनरावृत्ती झाली. पण या घोर आणि अमानवी कृत्याची न फिर्याद होती ना चौकशी. बिचारे हिंदू !

१९२८ च्या भीषण आपत्तीतून हिंदू लोक अजून स्वत.ला सावरीत होते तोच गोटर्याच्या स्थानीय मुसलमानानी हिसामोद्दीनला ठार मारल्याचा सूड हिंदूची कत्तल करून घेण्याचे ठरविले. त्याना खात्री होती की हिसामोद्दीन बरोवर कल्याणला गेलेल्या गावकऱ्यापैकीच कोणीतरी नक्की फितुर असावा. पोलिसानी काही गाडीवाल्यांना कैद केले. त्याना बेदम मारहाण केली. त्याना बोलते करण्याचा प्रयत्न यशस्वी झाला नाही. सावकार महादेवप्पा डुमणे आणि हरशेटप्पा बके पाटील याना गोवण्याचा मुसलमानाचा प्रयत्न गाडीवाल्यानी हाणून पाडला.

गोटर्यातील नागरिकाच्या रक्षणार्थ पोलीस पथक आले. त्या शुभ घटनेचे स्वागत करण्यासाठी म्हणून की काय रझाकारानी भर दिवसा पोलीस पाटील गुरुपादप्पा याना त्याच्या शेतात घेरून जिवे मारले आणि त्याचे प्रेत नदीकाठी अर्धवट पुरण्यात आले. गुरुपादप्पाच्या खुन्याना हिंदूनी पाहिले. त्याना हत्यारबंद रझाकारांनी धमकी दिली 'सत्य बाहेर आल्यास तुम्हालाही पाहून घेऊ.' बिचारे! उघडया डोळयानी हा अत्याचार बघून मिटल्या तोडानी घरोघर परतले.

पोलिसानी आपली कृपादृष्टी महादेवप्पा डुमणे यांच्याकडे वळविली. रझाकारांना डुमण्याजवळील शस्त्रांची कल्पना नव्हती. पोलिसानी हे काम पत्करले आणि एके दिवशी, भल्या पहाटे, एक सबइन्स्पेक्टर आपल्या दोन शिपायासह डुमण्याकडे गेला आणि असलेली शस्त्रे 'हजर' करण्याची आज्ञा केली. घराची झडतीही घेण्यात आली परतु कोणतेही अनधिकृत शस्त्र मिळाले नाही. एक भरमार बदूक आणि काराबिन, आवश्यक अनुमती पत्रासह, डुमण्यानी हजर केली. शस्त्रसामर्थ्याची नीट कल्पना घेऊन हल्ला करणे हा रझाकारी कूट नीतीचा नेहमीचा खेळ होता.

अमावास्येचे 'सूर्यग्रहण' सरून चैत्र महिन्याची हिंदू नववर्षाची सुरुवात व्हावयाची होती. दुसऱ्या दिवशीच्या सणाच्या तयारीत हिंदू नागरीक गर्क होते. बिचाऱ्याना कल्पनाही नव्हती की सूर्यग्रहण सुटलेले असले तरी राक्षसी रझाकार ग्रासणार आहेत. भल्या सकाळीच दोन हजार रझाकार घोडवाडी, हुमनाबाद, भालकी, कल्याण, बेलूरहून आले. गोटर्याचे रझाकार आणि पस्त अकवाम (हरिजन) त्याना जाऊन मिळाले. सकाळच्या वेळी स्नान पुजादी कर्मात हिंदू लोक दग होते आणि इकडे या लोकानी कत्तलीला प्रारभ केला. व्यवस्थेसाठी असलेल्या पोलीसपथकानेही त्याना व्यवस्थित साथ दिली. त्या दिवशी एकावन्न लोकाना जनावराप्रमाणे कापण्यात आले. हे लोक प्रथम घराला वेढा देत, मग घरात शिरत, जो हाती लागे त्याला फरफटत बाहेर ओढून आणत. तो बिचारा भयव्याकुळ होऊन ओरडत राही. बाहेर त्याची मान चिरण्यात येई. रामराव पटवारी आणि नारायणराव मक्तेदारसारख्या मातब्बर व्यक्तीना घरातून बाहेर ओढून, कसायांच्या कोयतीने कापण्यात आले. पोलीस पाटील भीमराव आणि त्याची पत्नी आपल्या दोन 'वछडयाना' वाचवू पहात होते. त्यानी अनेक वर्षे सभाळलेला आणि आता या कत्तलीत अग्रेसर असणाऱ्या रसूल नामक रझाकारास, त्यानी आपल्या मुलांना वाचविण्याची विनती केली. त्याच्या चरणावर चाळीस तोळे सोने ठेवले आणि शिवाय घरातील जी चीजवस्तू पाहिजे ती घेऊन जाण्याची मुभा दिली. त्याने रक्षणाचे वचन दिले. थोडयाच वेळात रसूलच्या सांगण्यावरून रझाकार त्या घरात घुसले. त्यानी भीमराव दापत्यासमोर त्याचा मोठा मुलगा बसप्पा यास कापले. भीमरावाचा क्रमांक दोन. त्यांची मान अर्धवट कापून, घरातील लहानमोठया गोवऱ्या एकत्र करून त्यात त्यांना फेकून त्या गोवऱ्या पेटविण्यात आल्या. धाकटा भाऊ आणि मुलगा रुद्रप्पा या गडबडीत बाहेर पळाले तो बाहेर पस्त अकवाम आणि रझाकारानी त्यांनाही कापून टाकले. स्वत च्या डोळयासमोर आपली मुले आणि पती याची निर्गम हत्या झाल्याचे पाहून त्या माऊलीस काय वाटले असेल हे शब्दातून व्यक्त करणे शक्तीपलीकडचे काम आहे.

शेजारच्या घरात रझाकार घुसले. त्यांनी तेथील कर्त्या पुरुषास पकडले. आपल्या भावाची हत्या होणार हे जाणूनही त्याच्या गर्भवती भगिनीने त्याच्यावर स्वत.चा देह झोकून दिला. तिला ओढून बाजूला करण्यात आले आणि तिच्या या आततायीपणाची शिक्षा म्हणून एका नराधमाने तिच्या कमरेत जबरदस्त लाथ मारली. परिणाम स्वरूप ती प्रसूत झाली आणि तिने एकवार आपल्या नवजात अर्भकाकडे भरल्या डोळयांनी डोळे भरून पाहिले व वेदना असह्य झाल्या म्हणून एकवार मिटलेले डोळे पुन्हा उघडलेच नाहीत. जन्माला आलेल्या त्या बालकाचे काय ? अनेकदा आश्चर्य घडते. त्या राक्षसानी जी अमानुष हत्या चालवली होती त्यांना त्या अर्भकाला मारणे काय अशक्य होते ? परतु ते अर्भक वाचले. आज त्या तरुणाला बाबू म्हणून सर्व ओळखतात.

ही झाली कत्तलीची कथा. महिलांवर झालेल्या भीषण बलात्काराची कल्पना येण्यासाठी केवळ एकच बोलके उदाहरण पुरेसे आहे. ग्रामजोशी काशीनाथ भटाच्या वहिनीवर त्या कामपिसाटानी इतक्यादा बलात्कार केला की त्यातच तिचा अत झाला. अनेक महिला नागविल्या गेल्या, 'अनेकावर' अनेकानी बलात्कार केला. जी स्त्री हाती सापडे, तिचा राक्षसी उपभोग घेण्यात आला. साऱ्या घटना अगावर शहारे आणणाऱ्या, केविलवाण्या तशाच सतापजनकही.

पोलीस, रझाकार, पस्तअकवाम यांनी गोर्टात त्या दिवशी जो हैदोस घातला त्याचे यथोचित वर्णन करणे अशक्य आहे. किंकाळया, आरडाओरड, रडणे, गोळीबार यांच्या समिश्र आवाजाने सारे वातावरण भरून गेले होते. तो पावेतो एक्कावन्न व्यक्तींना कठस्नान घालण्यात आले होते आणि दीन-दीन आवाज करीत ही मडळी, ही पिशाच्चे महादेवप्पा डुमण्याच्या वाडयाकडे वळली.

गावात लुटालूट, अन्याय, कापाकापी याची सुरुवात झाली तेव्हा डुमण्याच्या आसपासच्या घरातील पाचशे ते सहाशे स्त्रीपुरुषानी आपल्या मुलामाणसासह डुमण्याच्या वाडयाचा आश्रय घेतला. डुमण्याचा वाडा प्रशस्त आणि मजबूत होता. आसपासचे लोक आपल्या शस्त्रासह आले होते. सर्व लोक एकत्र आले तेव्हा दरवाजे बद करण्यात आले. डुमण्याच्या दुमजली घरावरून रझाकार आणि पस्त अकवाम याच्या हालचालीवर लक्ष ठेवणे शक्य होते. काही

धाडसी तरुण एकत्र आले आणि त्यांनी रझाकारांशी यशस्वी मुकाबला करण्याचे ठरविले. हळंबरे नागण्णा हा त्यापैकीच. त्याने लोकांना सांगितले, ' कोणत्याही परिस्थितीत रझाकाराना वाड्याजवळ येऊ द्यावयाचे नाही. डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवा. जवळ जवळ सहाशे जणांच्या प्राणरक्षणाची जबाबदारी आपली आहे. गलित गात्र होऊ नका. आपण थोडी जरी ढिलाई केली तरी आपण सर्व त्यांच्या हातात आयते सापडू आणि ते आपली निर्गम हत्त्या करतील. तशा प्रकारे मरण्यापेक्षा लढा देऊन मरू. जबाबदारीने लढू. घाई करू नका. भिऊ नका, आत्मविश्वास बाळगा. त्यांना पिटाळून लावणे महत्त्वाचे आहे. हिंमत सोडू नका. अन्य भार आता भगवतावर. त्याने पटांगणातील गोटे गच्चीवर जमा करण्याची आज्ञा केली. सर्वांना जागा नेमून दिल्या. असावध राहू नका म्हणून सांगून तोही आपली जागा घेण्यास गेला.

महादेवप्पाकडे विशेष शस्त्रे नाहीत याची खात्री असल्यामुळे रझाकार ' दीन-दीन ' ओरडत त्याच्या वाड्याकडे निघाले. ते टप्प्यात येताच त्यांच्यावर दगड, विटा गोट्याचा असा मारा करण्यात आला की विचारू नका. तो मारा इतका अनपेक्षित आणि अचुक होता की बरेचशे रझाकार जखमी झाले ' या अल्ला, ये क्या आफत है?' असे म्हणून ती मंडळी थबकली. मागे सरकली. माराही थांबला. या माऱ्यामुळे ' डुमण्या ' कडची काय व्यवस्था आहे याचा नीट अदाज रझाकाराना लागेना. काही धाडसी रझाकारांनी पाऊल उचलले. वीस एक जणांचे टोळके दबकत दबकत वाड्याकडे यावयास लागले. तो नागण्णाने त्यापैकी पधरा जणांना टिपले. तो उत्कृष्ट निशाणबाज होता. छतावरच्या लोकानी आनदाने टाळ्या पिटल्या. समोरून येण्याचे धाडस करणे आता त्या रझाकारांना शक्य नव्हते. त्यानी आजुबाजूच्या दुमजली घरात प्रवेश मिळविला आणि ते छतावर आले. त्यांनी तेथून सावकारांच्या छतावर दिवसभर गोळ्यांचा पाऊस पाडला. मारुती अण्णा कोणे आणि चन्नप्पा डुमणे गोळ्यांना बळी पडले. हळंबरे नागण्णा आणि त्याचे साथीदारही व्यवस्थित प्रत्यूत्तर देत होते. काशप्पा भाल्के आणि सिद्रामप्पा पटणे यांनी तर सतत शत्रूंवर गोळ्यांचा मारा चालू ठेवला होता. हळंबरे नागण्णा अतिशय सावध होता. वाड्यापर्यंत कोणत्याही रझाकाराला येऊ द्यावयाचे नाही हे त्याचे ध्येय. नागण्णाच्या नेमबाजीमुळे उघड आणि समोरून येणे रझाकाराना अशक्यप्राय करून टाकले. ज्या कोणी धाडस केले त्यांना ते अत्यत महागात पडले. त्यामुळे समोरच्या छतावरून गोळीबार करणेच त्यानी पसत केले. जवळ जवळ ७०–८० रझाकार आणि पस्त अकवाम कामी आले होते. नागण्णाच्या सावधपणामुळे आणि उत्कृष्ट नेमबाजीमुळे त्या दिवशी सहाशेच्यावर हिंदू सुरक्षित राहिले. ते वाड्यात घुसले तर सहाशे लोकाचा बळी पडतो. रझाकार निराश झाले. त्यांची हानी जास्त झाली होती. रात्र झाली तसे फायरिंग थांबले. रात्रीच्या अंधारात नागण्णा, आपल्या साथीदारांसह, आपणावर तुटून पडेल या भयाने रझाकार आणि पस्त अकवामांनी गावातून पलायन केले परंतु अपमानित आणि निराश रझाकार दुसऱ्या दिवशी जास्त तयारीने येतील आणि त्यांना तोंड देणे अपुऱ्या साधनांनी अवघड जाईल म्हणून रात्रीच गाव सोडून निघावे असे हिंदूनी ठरविले, नागण्णाच्या मार्गदर्शनाखाली पहाटे दोन-अडीचच्या सुमारास वाड्यातून माणसे बाहेर पडली.

दुसऱ्या दिवशी प्रचंड सख्येने रझाकार आले. त्यांनी दुरूनच डुमण्यांच्या वाड्यावर तास-दोन तास गोळीबार केला. गावात अन्यत्र स्मशान शांतता होती. प्रेतांचे लचके गिधाडे आणि कावळे तोडीत होते. कितीतरी घरे अजून जळत होती. गोळीबार करून करून रझाकार दमले. एकाही रझाकाराचे धाडस डुमण्यांच्या वाड्याकडे जाण्याचे होईना. नागण्णाच्या रूपात मृत्यू कोठे लपलेला आहे हे त्याना दिसेना. तीन तासाच्या सतत गोळीबारानतरही वाड्यातून काही प्रत्युत्तर नाही तेव्हा मंडळी सुटली हे रझाकाराना समजले. ते धैर्याने वाड्यात घुसले. त्यानी वाडा मनसोक्त लुटला. धनाच्या आशेने फरशीही उखडली. नतर घराला आग लावण्यात आली. दगडी भिंती सोडल्यास पूर्ण वाडा जळून खाक झाला.

नंतर महिनाभर आजूबाजूचे रझाकार ' गोर्टा ' लुटत होते. धान्य, रोकड, पशुधन, दारे, खिडक्या, कपडे जे हाताला लागेल ते नेण्यात आले. रझाकारानी आणि पस्त अकवामांनी आपापसात घरांची आणि जमिनीची वाटणी केली. कोणी पाटील बनला तर कोणी पटवारी. इतके रामायण घडले परतु शासनाला हे कळाले नाही.

पोलीस अॅक्शन होऊन आता सव्वीस वर्षे झाली आहेत. परतु गोटर्यात जाऊन राहायचा धोका पत्करण्यास मुसलमानांची वा पस्त अकवामांची तयारी नाही. तेथील हिंदूना तोड दाखविण्याची जणू त्याना लाज वाटते. गोटर्याच्या अमानुष हत्याकांडाची भयानकता एवढी तीव्र की पोलीस अॅक्शन नतर विनोबा भावे यानी या गावास खास


# फिडेल, चे आणि क्रांती

लेखक : अरुण साधू

किंमत : सात रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

ट देऊन हिंदूचे सांत्वन केले.

त्या भयाण अनुभवानतर गोटर्यावासीच्या चेहऱ्यावर उदास छाया दिसत आहे– अगदी कायम. हैदराबाद मुक्तीच्या आनंददायक प्रसगीही ती नाहीशी झाली नाही–होऊ शकली नाही. झालेली जखम भरलेली आहे परंतु व्रण कायम आहे. आजही त्या विषादाच्या छटा गोर्टेकर मंडळीच्या चेहऱ्यावर जाणवतात. ☐

# हुतात्मा पत्रकार शोईब उल्लाखाँ

जन्म : १२–१०–१९२० हत्या : २१–८–१९४८

हैदराबाद ! १९४७ मधील आक्टोबर मास समाप्तीची वाटचाल करीत होता. पावसाने दडी मारली होती. आणि थडीची अजून सुरवात व्हावयाची होती. रात्रीचे साडेनऊ दहा झाले असावेत. एरवी वृत्तपत्र कार्यालयातील ही गडवडीची वेळ. परंतु आज कार्यालयात एक वेगळेच चित्र दिसत होते. एक तरुण हमसून हमसून रडतो आहे आणि एक साधारणत वयस्क गृहस्थ त्याला समजावण्याचा प्रयत्न करीत आहे. सांत्वन करणारी व्यक्ती होती 'रय्यत' या ख्यातनाम दैनिकाचे मान्यवर सपादक श्री. एन्. नरसिंग राव आणि रडणारा तरुण होता उपसपादक शोईब उल्लाखाँ. बघणाऱ्याला वाटावे की तरुणाच्या घरात एखादी दुःखद घटना घडली असावी. परतु प्रत्यक्षात बाब वेगळीच होती.

'रय्यत' दैनिकाच्या प्रकाशनास निझामी शासनाने बदी घातली होती. गुप्तचर विभागाचे अधिकारी श्री. फजलरसुलखाँ यानी शासनाच्या हुकुमाची तामिली केली होती. आता 'रय्यत' प्रकाशित होऊ शकत नव्हते. आणि म्हणूनच शोईब लहान मुलासारखा असहाय्यपणे अश्रू ढाळीत होता. क्रूरव्यवहाराने निष्पाप भावनाची नेहमीच अवहेलना केली आहे. शोईबला शासनाने उचललेल्या या अन्यायपूर्ण पावलाबद्दल अत्यत वाईट वाटले. वृत्तपत्रावर शासनाचा अकुश असू नये असे त्याचे मत होते. श्री. नरसिंगरावानी त्याचे सात्वन करताना म्हटले 'शोईब माझ्याकडे बघ. मी या घटनेने आनदित झालो आहे. खरं म्हणजे या हुकुमाने मी व्यथित व्हावयास हवे. परतु मला समाधान आहे. माझे कर्तव्य मी चोख बजावले आहे आणि म्हणूनच वेवद शासनाच्या रोशास 'रय्यत' पात्र झाले आहे. नागरीक स्वातत्र्य, लोकतत्र, राजकीय सुधारणा, हिंदू-मुसलमानसामजस्य, हैदराबाद राज्याचे भारतीय सघराज्यात विलीन होणे– या सर्व बाबीवर मला जे सांगावयाचे होते ते मी निर्भीडपणे सांगितले, लिहिले आणि माडले. सर्व सागून झाल्यावर 'रय्यत'वर बदी हुकूम आला आहे. मग दु.ख कशासाठी? आपण आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावले आहे. आणि त्याचे मला मानसिक समाधान आहे.'

श्री. नरसिगरावाच्या बोलण्याने शोईब प्रभावित झाला खरा परतु म्हणून शस्त्र खाली ठेवणे त्याच्या तरुण रक्ताला मानवणारे–पटणारे नव्हते. अन्यायाविरुद्ध पाय रोवून उभे रहावे असे त्याला वाटत होते. स्वतत्र पत्रकारितेच्या आपल्या ध्येयाला तो सोडू इच्छित नव्हता. शासन आपल्या दडप नीतीने जनतेचा आवाज दडपून टाकू इच्छित होते, तर शोईब हा आवाज बुलद ठेवण्याचा प्रयत्न करू इच्छित होता. खऱ्या सैनिकाप्रमाणे अखेरपर्यंत लढा देऊ इच्छित होता. थोड्याच वेळात शोईब शात झाला आणि तो नरसिंगरावाना म्हणाला, 'पडितजी, हा विनाशाचा श्रीगणेशा आहे. जनतेचा आवाज उठवणे ही काळाची गरज आहे. आणि यासाठी हवे एक निर्भिड, ध्येयवादी आणि सत्यप्रतिपादन करणारे वृत्तपत्र आणि तितकाच ध्येयवादी, निर्भीड आणि सत्यवादी सपादक. पडितजी काळाची गरज मी पूर्ण करू इच्छितो. 'रय्यत' बद करून शासनाचे ईप्सित साध्य होणार नाही. माझ्याजवळ 'इमरोज' नावाचे वृत्तपत्र चालविण्याचे अनुमतिपत्र आहे. पडितजी, 'रय्यत' 'इमरोज'च्या स्वरुपात प्रकाशित होईल. आपला कृपाशीर्वाद द्यावा. भगवताकडे आपण माझ्यासाठी प्रार्थना करा आणि 'दुवा' मागा. आपले कार्य जिवात जीव असेपर्यंत मी निष्ठेने करीत. स्वतत्र पत्राकरिता माझे ध्येय आहे, स्वप्न आहे, जीवितकार्य आहे. आपण या वृत्तपत्रासाठी आर्थिक सहाय्य मात्र मिळवून द्यावे. बस्स एवढीच, नम्र प्रार्थना.'

पडितजीनी शोईबकडे पाहिले. त्याच्या चेहऱ्यावर अमाप उत्साह होता. डोळयात दुर्दम्य आत्मविश्वास दिसत होता. नम्रता आणि ध्येयनिष्ठा शब्दाशब्दातून आकार घेत होती. पडितजीनी आर्थिक साहाय्य मिळवून देण्याचे मान्य केले आणि त्याला सल्ला देताना म्हटले, 'शोईब, तू वृत्तपत्र जरूर चालू कर पण राज्याबाहेर जाऊन हे कार्य कर. येथील परिस्थिती दिवसेदिवस चिघळत आहे. माझे वृत्तपत्र शासनाने बद पाडले. तुला ते जिवे मारतील. 'इथे तुझ्या जिवाला धोका राहील.' शोईबने पडितजीच्या डोळयात पाहिले. त्याला त्या शात डोळयात सत्यता आणि वात्सल्य दिसले. त्याने ठामपणे सागितले, 'पडितजी, वृत्तपत्र चालवीन ते हैदराबादेत राहूनच. मरणाच्या भीतीने मी कार्यक्षेत्र सोडून जाणार नाही. मरण कोणाला चुकले आहे? निदान या माझ्या प्रिय भूमिला, माझ्या रक्ताचा अभिषेक तरी होईल.' पडितजीनी शोईबकडे पाहिले. आजचा शोईब त्याना वेगळा वाटला. त्यानी, पुनर्भेटीचे आश्वासन देऊन, सद्गदित होऊन, आपल्या शिष्याला निरोप दिला.

शोईब बाहेर पडल्यावर श्री. नरसिंगरावानी आपले पाय लाब केले. मनावर केवढे ओझे होते. पण तरीही ते शात होते. त्याच्यासमोर दोन-अडीच वर्षापूर्वीचा प्रसग आकार घेऊ लागला. सपादकीय कार्यालयात एके

दिवशी एक सुस्वरूप आणि तडफदार तरुण प्रवेशला. त्याने नमस्कार केला. आपल्या संकेतानुसार तो खुर्चीवर बसला. ' काय काम काढलेत ?' या आपल्या प्रश्नाला ' रय्यत ' परिवारात काम करण्याची इच्छा आहे असे असे त्या युवकाने सांगितले. त्याने स्वतःचा संपूर्ण परिचय करून दिला.

' रयत ' - राष्ट्रीय विचारसरणीचे उर्दू दैनिक होते. श्री. एम्. नरसिंगराव त्याचे संपादक होते. हैदराबाद शासनाची राजभाषा उर्दू होती आणि म्हणून अधिकतर वृत्तपत्रें उर्दूतून निघत. स्वतंत्र प्रज्ञेचा पत्रकार म्हणून नरसिंगरावांना मान होता. त्यांनी एकवार त्या तरुणाकडे पाहिले आणि समोर पडलेल्या वृत्तपत्रातील एका बातमीवर संपादकीय लिहिण्यास सांगितले. नियोजित वेळेत त्याने संपादकीय लिहिले. शैली आणि विचाराचे संतुलन यथायोग्य होते. नंतर एका इंग्रजी वृत्तपत्रातील बातमीचे भाषांतर करण्यास सांगण्यात आले. भाषांतरही छान केले गेले. आलेला तरुण चाचणीत यशस्वी ठरला.

पंडितजींनी त्या तरुणाला आपल्या वर्तमानपत्राच्या ध्येयधोरणाची कल्पना दिली. आणि तो तरुण—जो पूर्वी रॉयिस्ट विचारसरणीच्या ' ताज ' साप्ताहिकात काम करीत असे—आपल्या राष्ट्रीय विचारसरणीच्या वृत्तपत्रात कितपत एकरूप होईल, रस घेईल याबद्दल संदेह प्रकट केला. आलेल्या तरुणाने त्यांना स्वतःसंबंधी विश्वास दिला आणि ' रय्यत 'च्या विचार धोरणाला चिकटून कार्य करण्याचा मनोदय प्रकट केला.

पंडितजींनी त्या तरुणाकडे अभिमानाने पाहिले आणि म्हटले, ' शोईब पत्रकारिता सतीचे वाण आहे. सध्याच्या हलाखीच्या स्थितीत तुला मोबदलाही अत्यल्प मिळेल. तू पदवीधर आहेस. विवाहित आहेस. तुझे वडील आणि काका सरकारी कामात आहेत. तू मुसलमान आहेस. त्यामुळे चांगल्यापैकी नोकरी मिळणे अवघड नाही. तेव्हा वृत्तपत्रीय जीवनात येण्यापेक्षा सरकारी नोकरी कर असाच मी अनुभवी सल्ला देईन. नीट विचार करून चार-सहा दिवसानंतर निर्णय कळव. ' ' माझा निर्णय तयार आहे. मला सतीचे वाण स्वीकारू द्या. ' त्या तरुणाने आर्जविले.

शोईबला उपसंपादक करण्यात आले. लवकरच शोईब रय्यतमध्ये सामावून गेला. त्याचे वेतन रु. ५०/– होते ते रु. ७५/ करण्यात आले. अर्थातच शोईब तेथे नोकर म्हणून काम करीत नव्हता. पत्रकारिता त्याचा जीवितहेतु होता. आणि म्हणूनच ' रय्यत 'वर लावलेल्या बंदीहुकूमाने तो व्यथित झाला. भावनावेग असह्य होऊन रडला.

' रय्यत 'वर बंदीहुकूम लावल्याच्या दुसऱ्या दिवसापासून शोईबने नवे वृत्तपत्र सुरू करण्याची तयारी चालविली. पंडितजींनी शोईबला श्री. बी. रामकिशनराव यांच्याकडे नेले. आणि शोईब व ' इमरोझ 'संबंधी कल्पना देऊन आर्थिक सहाय्य देण्याची विनंती केली. श्री. बी. रामकिशनरावांनी आर्थिक भार स्वीकारण्याची तयारी दाखविली. तेव्हा शोईबला आकाश ठेंगणे झाले. पुढील कामाची जुळवाजुळव सुरू झाली. आणि ' इमरोझ 'चा प्रथमांक दि. १५–११ १९४७ रोजी प्रकाशित झाला. लोकांना तो जवळचा वाटला. लोकांच्या व्यथांना वाचा फोडण्याचे कार्य ' इमरोझ 'ने प्रथमपासूनच अंगिकारले. ' इमरोझ 'चा खप शुक्लेंदुवत वाढीस लागला. आणि थोड्याच दिवसात वृत्तपत्रीय कार्यालय श्री. बी. रामकिशनरावांच्या घरी आणण्यात आले. ' इमरोझ ' दिवसेंदिवस लोकप्रिय होत चालले तसे ते सरकारच्या मनात सलू लागले. डोळ्यात खुपू लागले. हैदराबादमध्ये तेव्हा राक्षसांचे राज्य होते. रझाकाराच्या असुरी शक्तीचा नंगा नाच राजरोस चालू होता. शांती आणि समाधान लयाला जाऊन बेबंद कारवाईंना ऊत आला होता. रोज नव्या अन्यायकथा, रोज नव्या जीवघेण्या व्यथा. शोईबने या कारवायांवर प्रकाश फेकीत असता आपल्या लेखणीस विलक्षण धार चढविली. तो अत्यंत तिखट आणि जहाल लेखन (अर्थातच सरकारच्या नीतिधोरणाविरुद्ध) करू लागला. दि. २९–१–१९४८ चा ' दिन की सरकार और रात की सरकार ' हा त्याचा अग्रलेख अत्यंत प्रक्षोभक ठरला. निझामी राजवट निझामी सेना, पोलीस, रझाकार आणि अकार्यक्षम अधिकारी वर्ग यावर प्रस्तुत अग्रलेखात त्याने जळजळीत विचार मांडले. गांधी टोपी घालून, गांधींचा जयजयकार करीत इत्तेहादुल मुसलमीनच्या रझाकारांनी गावेच्या गावे लुटली, जाळली. अनन्वित अत्याचार केले. ' इमरोझ 'ने त्यांचा कटू शब्दात धिक्कार केला. त्यांच्या या नीतीचा कडक निषेध केला. नवाब मीर अकबर अलीखान आणि कम्युनिस्टांची अत्यंत कडक शब्दात हजेरी घेतली. आणि ' सार्वजनिक आंदोलन कधीच अयशस्वी होत नसते ' असा पीडित आणि असहाय्य जनांना दिलासाही दिला. ' बीबीनगर हत्याकांडा 'ची चौकशी व्हावी आणि रझाकाराच्या पाशवी अत्याचारास पायबंद घालावा अशी आग्रही मागणी केली. श्री. रामाचारी (मंत्री)यांच्या राजीनाम्यामागे कोणते राजकारण आहे याचा शांत चित्ताने, संयमाने, न्यायबुद्धीने विचार व्हावा, नसता' ही बाब सर्वनाशाची नांदी ठरेल आणि उभयपक्षी प्रचंड हानी होईल असा इशाराही दिला आणि प्राप्त परिस्थितीवर एकमेव तोडगा आणि तो म्हणजे लोकनियुक्त शासनाची स्थापना असे त्याने प्रतिपादले.

' इमरोझ ' अचल निष्ठेने आपले कर्तव्य बजावीत होते. जून १९४८ मध्ये एका भाषणात रझाकार नेता कासिम रझवीने ' निकट भविष्यात दिल्लीच्या लाल किल्ल्यावर असफिया झेंडा फडकाविला जाईल ' अशी गर्वोक्ती केली. ' इमरोझ 'ने अत्यंत कठोर शब्दात या भाषणाची वाट लाविली. रझवी साहेबाच्या तळपायाची आग मस्तकाला गेली तो डिवचला गेला. एकीकडे रझाकार समर्थक हैदराबादची समस्त वृत्तपत्रीय पलटण त्याला पुरेपूर साथ देत होती. आणि दुसरीकडे एकाकी इमरोझ त्याला दम टाकण्यास लावीत होता. इमरोझचे कठोर आघात त्याला असह्य झाले. आणि विशेषतः युवा मुसलमान संपादक शोईब त्याला सलू लागला. शोईबचा विरोध मुळापासून उपटून टाकण्याचा निश्चय ' नानज डे ' निमित्त आयोजित प्रचंड सभेत भाषणातून अप्रत्यक्षतः व्यक्त झाला.

' नानज ' या गावाला भारतीय सेनेने आपल्या अधिकारात घेतले आणि रझाकारांच्या धुडाईस यशस्वी आळा घातला. रझाकार आणि निझामी सेनेचे छुपे हल्ले बंद पडले. २४–७–१९४८ च्या या कारवाईमुळे रझाकार नेता हादरला. त्याने भारत सरकारच्या आक्रमणाच्या निषेधार्थ एक सभा, जमरूद महल टॉकीज येथे दि. १९–८–१९४८ रोजी आयोजित केली. त्या प्रचंड सभेत त्याने आपली मळमळ बोलून दाखविली आणि अप्रत्यक्षत: शोईबवर राग काढून गर्भित धमकीही दिली.

१९–८–४८ शहरातील सर्व रस्ते ' जमरूद 'महलकडे धावत होते. चित्रपटगृह खचाखच भरले होते. जागा न मिळालेल्या लोकांनी आवारात गर्दी केली होती. मुंग्यांना प्रवेश घेण्याइतपतही जागा नव्हती. सभेला सुरुवात झाली. अनेक वक्त्यांनी उत्तेजनपूर्ण

भाषण केले. भारत सरकारच्या आक्रमणाचा कठोर शब्दात धिक्कार करण्यात आला. समारोपाचे भाषण करावयास रझाकाराचा साला रे आझम 'कासिम रझवी' बोलावयास उठला तेव्हा त्याच्या जयजयकाराने आकाश दुमदुमले. रझाकाराच्या क्रोधाला आणि आवेशाला सीमा नव्हती. रझवी ध्वनीक्षेपकाशी आला तेव्हा आपल्या प्रिय नेत्याचे भाषण ऐकण्यासाठी उपस्थितानी आपले प्राण कर्णाचे ठायी आणले रझवीने भाषणास प्रारंभ केला. भाषण कसले? रझवी आग ओकीत होता. भाषणाच्या ओघात त्याने इमरोझ आणि त्याचा युवा मुसलमान संपादक शोईबचा उल्लेख केला आणि तो आवाज चढवून गरजला, 'अब पुतलियोका नचानेवाला चाहे कोई भी हो उससे मुझे कोई सरोकार नही! मगर जो हाथ मुसलमानोके एकतेदार खिलाफ, मुसलमानोकी इज्जत और नामूस के खिलाफ उठता है, उस हाथ को गिर जाना चाहिए, या कट जाना चाहिए!' कासिम रझवीचा स्पष्ट रोख 'नचानेवालो' पर नसून 'नाचनेवालो' पर होता. अर्थातच शोईबवर होता. निझामी राजवट आणि त्याच्या उदार आश्रयाखाली चाललेल्या रझाकारी कृत्यावर यथोचित प्रहार करणाऱ्या शोईबच्या लेखणीचा हा प्रताप 'इमरोझचा' हा प्रभाव. रझवी आणि त्याचे रझाकार 'इमरोझ'च्या आघाताने घायाळ झाले. नानज डे निमित्ताने झालेल्या भाषणातून वक्त्यानी आपली आतरिक व्यथा बोलून दाखविली.

दि. २१–८–१९४८ रात्रीचा एक वाजलेला. रस्ता पोट भरलेल्या अजगरासारखा, सुस्त पडलेला होता. दिवे लागणी नतर जिथे वर्दळ नसायची त्या रस्त्याची मध्यरात्रीनतर कोणती अवस्था असेल? सगळीकडे निजानिज झाली होती. चोहीकडे भयाण शाततेचे साम्राज्य पसरले होते. मध्येच कोठेतरी कुत्र्याचे बेसूर रडणे आणि ओरडणे कानावर येत होते. भयाण शाततेची भयाणता तीव्रतेने जाणवत होती. रस्त्यावरचे दिवे मद आणि घराघरातले दिवे घालवलेले. प्रकाशाची हकालपट्टी करून अधाराने जणू आपले साम्राज्य प्रस्थापित केले होते. 'चप्पल बाजार' चौररस्त्यावरील एका घरात मात्र प्रकाशाचे साम्राज्य होते तेथे होते इमरोझचे कार्यालय. शोईबचे स्वतत्र राज्य. दुसऱ्या दिवशीच्या अकाची जुळवाजुळव, छपाई चालू होती, साधारणत: सव्वा वाजता, आपले काम आटोपून, शोईब आपल्या मेहुण्यासह (मोहमद इस्माईलखाँ) कार्यालयाबाहेर पडला. रस्ता निर्मनुष्य आणि शात होता. दोघानी चौरस्ता ओलाडला. लिंगमपल्ली मार्गावरील शोईबचे घर आता केवळ ५०–६० पावलावर होते. चौरस्ता ओलाडून ते घराच्या दिशेने वळले. तोच मागे काही लोक धावत आले. एकाने 'आता एक मनुष्य इकडे पळत आला तो कोठे गेला?' असा शोईबला प्रश्न केली शोईबने, 'इकडून कोणी पळाला नाही' असे उत्तर दिले. त्याने शोईबला सलाम केला आणि इतक्यात एकाने गोळी झाडली. एक-दोन-तीन दुसऱ्या गोळीला शोईब कोसळला तरीही तिसरी गोळी मारण्यात आली. एकाने समोर येऊन शोईबचे हात तलवारीने तोडले. शोईबच्या मेव्हण्यावरही हल्ला केला गेला. त्याचा एक हात तोडण्यात आला आणि दुसऱ्या हाताचे बोट उडवण्यात आले. हल्ल्याच्या आवाजाने आणि ओरडाआरडीने लोकाना जाग आली. हल्लेखोर पळाले. घराघरातले दिवे प्रकाशले. जखमी आणि मरणाच्या उबरठ्यावर असणाऱ्या शोईबला आणि त्याच्या मेव्हण्याला घरात नेण्यात आले. शोईब शुद्धीत होता. अनत वेदना त्याला होत असाव्यात. तरीही त्या अवस्थेत त्याने आपल्या पत्नीला धीर दिला. सुखाची विविध स्वप्ने ज्या वयात पहावी, अनुभवावी त्या वयात पतीचा निर्घृण खून पहाण्याची पाळी त्या अभागिनीवर आली होती. तिने हबरडा फोडला. शोईबने म्हटले, 'रडू नकोस. काळजी करू नकोस, श्री. रामकिशनजी धूत आणि रामाचारी वकील तुला सहाय्य करतील. अल्लावर भरवसा ठेव. मी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावले आहे. म्हणूनच मला मरणाचा अफसोस नाही!' शोईबची आई मुलाच्या अवस्थेकडे दाटल्या डोळ्यांनी पहात होती. अवाक् अचल! शोईबला रक्तस्त्रावाने असह्य थकवा आला. आणि साधारणः तीनच्या सुमारास त्याची प्राणज्योत अनतात विलीन झाली.

कासिम रझवीच्या घोषणेचा परिणाम म्हणून की काय मुसलमानांच्या एकतेवर प्रहार करणाऱ्या शोईबचे हात तोडण्यात आले त्याचे जहाल लेखन बद पाडण्याचा तो एकमात्र उपाय वाटला त्यांना. विद्यार्थी दशेतच शोईबने हाती लेखणी घेतली. तलवारीप्रमाणे धारदार असलेली 'ताज' साप्ताहिक, 'रय्यत' दैनिक बद पडले; पाडण्यात आले. त्याला कारण केवळ शोईबची सत्यप्रेमी लेखणी. इमरोझ मधील लेखानी त्याच्या प्राणावर बेतले. सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीत केवळ शोईबच आपल्या व्रतानुसार निर्भयपणे अविचल निष्ठेने इमरोझचे प्रकाशन करीत होता. त्याच्या मार्गात अनत अडचणी उपस्थित केल्या जात होत्या. न्यूझप्रिंट देण्यात पक्षपात केला जात होता. सेन्सॉर बोर्ड सतत छळीत होते. अनेक अज्ञात व्यक्तीकडून धमकीवजा पत्राचा पाऊस पडे पण अदम्य उत्साह, प्रखर सत्यनिष्ठा, अचलधैर्य आणि असाधारण मानसिक सतुलन यामुळे स्वतत्र पत्रकारितेची प्रतिष्ठा प्रामाणिकपणे तो निभावू शकला. शोईब धर्माने मुसलमान होता परतु साप्रदायवादाशी त्याने निस्वार्थ बुद्धीने सामना दिला. प्रजातत्र आणि ममता याचा तो कट्टर समर्थक होता. राष्ट्रीय बाण्याचा तो एक आदर्श तरुण होता.

शोईबच्या हत्येची वार्ता सकाळी सर्वाना कळाली. अनेक कार्यकर्ते जड अत:करणाने जमा झाले. परतु पोलिसानी, पोस्टमार्टेम नतर न शव दिले, न शवयात्रेची परवानगी. शोईबच्या नातेवाकाच्या उपस्थितीत, पोलिसानी शोईबचा दफनविधी पार पाडला. दूर उभे राहून, डोळयात आसवाचा महासागर साठवून, हिंदु कार्यकर्ते शोईबच्या कार्यास मनोमन मानवदना देत होते.

शोईबचा मृत्यू एका कर्तव्यपरायण पत्रकाराची आत्माहुती आहे. त्याला नेहमी धमकीची पत्रे येत. पोलिसाचे सरक्षण घ्या असा कोणी सल्ला दिल्यास 'बचानेवाला खुदा है' असे तो म्हणे. शोईबच्या हत्येने पतप्रधान जवाहरलाल नेहरू याचा भ्रमनिरास झाला आणि पोलीस ॲक्शनचा दिवस जवळ आला हे निश्चित. म. गांधीबद्दल त्याला नितात आदर वाटायचा. गाधीजीच्या हत्येबद्दल त्याला कळले तेव्हा तो व्यथित झाला. Gandhiji had a glourious death अशी प्रतिक्रिया त्याने व्यक्त केली. तरुण शोईब बद्दलही असेच म्हणता येईल. लेखन स्वातत्र्याच्या बलिवेदीवर त्याने हौतात्म पत्करले. स्वतत्र पत्रकारितेचा ध्वज त्याने आत्मबलिदानाने अधिक उचावला. शोईब मरण पावला? छे: ! तो अमर झाला. त्याचे नाव अमर झाले.

जिन्दगी जिंदा दिली को जान ऐ रोशन
वरना कितने मरे और पैदा होते जाते है !

□

**[ हैदराबाद मुक्तिसंग्रामातील पहिली 'अज्ञात कथा' माणूसच्या गेल्या १२ ऑक्टोबर अंकात प्रसिद्ध झाली होती. आणखी काही कथा माणूसमधून क्रमशः प्रसिद्ध होत आहेत. ]**

पुस्तके

नाटककार खाडिलकरांची पूर्णत्वाने ओळख करून देणारा ग्रंथ

# नाट्याचार्य खाडिलकरांची नाट्यकला

सौ. सुहास नाईक

'नाट्याचार्य खाडिलकरांची नाट्यकला' या शीर्षकाच्या पुस्तकात नाटककार म्हणून खाडिलकराची महती प्रामुख्याने वर्णन केलेली असणार हे उघडच आहे; या पुस्तकाचा केवळ तेवढाच आवाका नाही. प्रस्तावनेत श्री. नीलकंठ खाडिलकर म्हणतात, 'नाट्याचार्यांची नाटके हा माझ्या अनेक वर्षांच्या चिंतनाचा विषय आहे' परंतु खाडिलकरांची केवळ नाटकेच नव्हेत तर खाडिलकर ही व्यक्तीच लेखकाच्या चिंतनाचा विषय असली पाहिजे असे या पुस्तकावरून दिसते. नाटककार म्हणून खाडिलकराची सर्व बलस्थाने विशद करताना खाडिलकर या व्यक्तीच्या विचार-कृती-उक्ती यामागील आंतरिक प्रेरणा कोणत्या यावर उद्बोधक रीतीने प्रकाश टाकला गेला आहे. खाडिलकर हे प्रथम नाटककार होते, पण त्याचबरोबर आणखीही बरेच काही होते. त्यानी राजकारणात भाग घेतला होता, ते लो. टिळकाचे निस्सीम भक्त होते, त्याचबरोबर ते वृत्तपत्रकारही होते. अध्यात्माचाही त्यानी विचार केला होता. अशा विविध क्षेत्रात गती असलेल्या प्रतिभावान व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व बहुढंगी झालेले असते व त्याच्या कलाकृतीत ह्या व्यक्तिमत्त्वाचे पडसाद वेधक स्वरूपात उमटलेले दिसतात. खाडिलकरांच्या नाट्यकृतीतून त्यांच्या बहुढंगी व्यक्तिमत्त्वाची साक्ष तर मिळतेच परंतु या ग्रथात खाडिलकराना या विविध क्षेत्रात गती असण्यामागच्या मूळ प्रेरणा 'पुरुषार्थ व चिंतनशीलता' या असल्याचे सागून त्या क्षेत्रांना एका समान सूत्रात बांधून टाकले आहे. पहिल्याच लेखात नीलकंठ खाडिलकर सागतात की खाडिलकराच्या सपूर्ण जीवनाचा नि धाडसी असामान्य निर्णयाचा विचार केला तर त्यात विलक्षण सुसगती दिसते आणि ही सुसगती त्याच्या चिंतनशीलतेतून निर्माण झाली होती, ह्या सुसंगतीचे भान पुढील विवेचनात सतत ठेवले गेल्यामुळे खाडिलकर ही व्यक्ती सुसगतपणे व एकसधपणें वाचकांसमोर उभी रहाते.

'वीरवृत्ती हे खाडिलकराचे शस्त्र होते व चिंतनशीलता हे वीरवृत्तीचे शस्त्र होते' असे लेखक सागतात. ही वीरवृत्ती म्हणजे खाडिलकराच्या नाटकाचा स्थायी भाव असलेला 'पुरुषार्थ'च होय. 'अर्थस्य पुरुषो दास:' या वचनाचा अर्थ 'पुरुषार्थाचा माणूस दास आहे' असा खाडिलकरानी केला. त्यानी रेखाटलेली प्रमुख पात्रे 'पुरुषार्थाची दास आहेत. त्याचे खलनायकही रूढ अर्थाने खलपात्रे नाहीत. ते प्रथम पुरुषार्थी आहेत. मानासाठी हपापलेली पात्रे आहेत. मग अहकारादि दोषानी त्याच्यामध्ये खलत्व येते. याचे उदाहरण म्हणून कीचकाचे पात्र किती बारकाव्यानिशी व मुलायम छटानी रगविले गेले आहे हे लेखकाने बहारीने वर्णन करून या बारकाव्यामुळे स्वभावचित्रण बहारीचे तर झाले आहेच पण नाट्याचा प्राण असलेला सघर्ष या बारकाव्यामुळे तीव्र झाल्याचेही दाखवून दिले आहे.

'खाडिलकराच्या नाटकातील सामर्थ्य हा न सपणारा शोध आहे. ते जाणवते पण पकडता येत नाही' असे सागूनही त्याच्या नाट्यकलेची बलस्थाने लेखकाने विस्ताराने सागितली आहेत खाडिलकर नाटकाच्या पहिल्या प्रवेशातच सघर्ष झटपट उभा करतात. हा सघर्ष स्वाभाविक व भक्कम पायावर उभा असून त्याची वीण पक्की असते. स्वभावचित्रण व दोन्ही बाजूचे जबरदस्त ताण याच्या सहाय्याने हा सघर्ष नाटकात शेवटपर्यंत खेळवण्याचे खाडिलकराचे कौशल्य कीचकवध, भाऊबंदकी या नाटकाच्या सहाय्याने पटवून दिले आहे. या ताणाचा प्रकर्ष ज्या ठिकाणी होतो तो नाटकाचा कळसबिंदू खाडिलकरांच्या नाटकातून किती परिणामकारक होतो याचाही उल्लेख केला गेला आहे.

नाटकाच्या भाषेबद्दल देखील काकासाहेबाची विशिष्ट दृष्टी असल्याचे नीळकंठ खाडिलकर दाखवून देतात. अतिरिक्त काव्यात्मक सवाद नाट्यास मारक ठरतात. अनुप्रासयुक्त उत्तुंग कल्पनाच्या भराऱ्या असलेली दीर्घ स्वगते उच्चारातील सगीतमयतेमुळे प्रेक्षकांना मुग्ध करीत असतील पण त्यांचा अर्थ मनात उतरून प्रेक्षकाच्या मनातून अनुकूल तरंग उठत असतील हे सभवनीय कमीच. खाडिलकराची भाषा याविरुद्ध आहे नाटक वाचताना त्याची भाषा अगदी गद्य, रूक्ष वाटली तरी नाट्यप्रयोगात ती अतिशय परिणामकारक ठरत असे. 'रामशास्त्र्यांच्या सभाषणातील उतारे व इतर अनेक उतारे उदाहरणादाखल दिल्याने हे विवेचन प्रत्ययकारी झाले आहे.

भाषेबद्दलचे हेच तत्त्व वृत्तपत्रकार खाडिलकरानी अनुसरलेले दिसते. पाच-दहा मिनिटात वाचून होईल असा सुटसुटीत अग्रलेख असावा, भाषा सोपी असावी, कारण वृत्तपत्र हे सर्व थरातील वाचकांसाठी असते हा काकासाहेबाचा आग्रह असे. वाचक हा वृत्तपत्राचा मालक आहे, त्याच्याशी द्रोह करता कामा नये असे त्याचे तत्त्व होते.

खाडिलकरांच्या रगलेल्या व पडलेल्या नाटकाबद्दल लिहिताना प्रा. ना. सी. फडके यानी 'लो. टिळकाच्या मृत्यूनतर खाडिलकराची नाट्यकला पोरकी झाली.' या शब्दात केलेली मीमासा लेखक अमान्य करतात. खाडिलकराचे स्फूर्तिस्थान व प्रेरणास्थान महाभारत असल्याचे ते सांगतात व त्याखालोखाल त्याच्यावर शेक्स्पियर, भवभूती, कालिदास याचे प्रभाव पडल्याचे सागतात. काकासाहेबाच्या आत्मनिवेदनातून अशा अर्थाचे उल्लेखही त्यानी उद्धृत केले आहेत. खाडिलकराची न रगलेली नाटके म्हणजे सत्त्वपरीक्षा, सवतीमत्सर, द्रौपदी,

मेनका व सावित्री ही होत. ही नाटके नं रगण्याची नीळकठ खाडिलकर यानी सागितलेली कारणे बरीच पटण्यासारखी आहेत. भीम, कृष्ण हे आपल्यासारखेच विकार, भावना असलेली पात्रे असल्याने प्रेक्षकाना जवळची वाटतात. या आकर्षणाची काकासाहेबांनीही अशीच मीमासा केली आहे. 'मनोविकाराचा झगडा ज्यात जास्त असतो त्याचे वाह्य दर्शनही ठसठशीत असते. त्यामुळे प्रेक्षकांचे मन त्याकडे चटकन ओढले जाते विचाराचा सग्राम कमी दिखाऊ व सहज लक्ष वेधून घेणारा असतो' असे ते सांगतात. म्हणूनच राम, हरिश्चद्र ही पात्रे प्रेक्षकाचे हृदय जिंकू शकली नाहीत. तरीही ही दुसऱ्या प्रकारची नाटके खाडिलकरानी लिहिली याचे कारण खाडिलकराची चिंतनशीलता महाभारतातून मानवी मनाचा शोध घेत असे तद्वतच शाश्वत तत्त्वाचाही शोध घेत असे ह्या नाटकातून दिसणाऱ्या कल्पनांच्या सघर्षाचे तसेच विचारसौंदर्याचे त्याना स्वतला आकर्षण होते. द्रौपदी, मेनका व सावित्री या तीन नाटकाविषयी लेखकाने म्हटले आहे की देवयानी आणि रुक्मिणी याप्रमाणे या नायिकानी विविध तत्त्वाची निर्मिती केली नाही. त्याऐवजी वैचारिक युक्तिवादाच्या फैरीवर फैरी झाडल्या, म्हणून त्यानी लोकाना मोहविले नाही.

'नाटचाचार्य खाडिलकर नि बालगधर्व' या प्रकरणामध्ये खाडिलकर व बालगधर्व यांच्यामधील मित्रत्वाचे सबध तपशीलवार आणि परस्पर हितसबधाचे ताण व जिव्हाळा यासह विस्तृतपणे वर्णन करण्यात आले आहेत.

'कीचकवध' खाडिलकराचे तेजस्वी नाटक आहे हे खरेच नाटक ही जबरदस्त ताकद आहे आणि नाटकात राजकीय जागृतीचे अफाट सामर्थ्य आहे याची पहिली जाणीव 'कीचकवध' नाटकाने दिली हे विवेचनही पटणारे आहे. परतु 'कीचकवध' नाटक हॅम्लेटपेक्षा सरस ठरवून 'कीचकवधा'ने 'हॅम्लेट'वर मात केली हे सिद्ध करण्याचा अट्टाहास अनावश्यक आहे. हे करण्यासाठी या पुस्तकातील एक प्रकरण खर्ची घातले आहे या दोन्ही नाटकाची या प्रकरणात सविधानक, सघर्ष, स्वभावपरिपोष व रसनिष्पत्ती या दृष्टिकोनातून तुलना करून 'कीचकवध' हॅम्लेटपेक्षा श्रेष्ठ ठरविले आहे कीचकवधाचे श्रेष्ठत्व स्वतत्रपणे पटवून देणे पुरेसे होते आणि निरोगीही.

अखेरच्या प्रकरणामधून खाडिलकरांच्या सर्व नाटकाबाबत नाटचलेखन, प्रयोग, नटवर्ग इ. तपशील, काही आठवणी, खाडिलकराचे नाटचविषयक विचार ज्यातून व्यक्त होतात अशा गणपतराव बोडस, वीर वामनराव जोशी इ. व्यक्तीनी सांगितलेल्या त्यांच्याबद्दलच्या आठवणी, अभ्यास ग्रथ सूची अशी विविध प्रकारची उपयुक्त माहिती दिली आहे.

काही ठिकाणी केलेले समर्थनात्मक विवेचन, आठवणी, यांची पुनरावृत्ती इत्यादी दोष वगळता खाडिलकर हे नाटककार म्हणून पूर्णत्वाने जाणवून देण्यास हा ग्रथ समर्थ ठरला ताहे.

**नाटचाचार्य खाडिलकरांची नाटचकला**
श्री. नीलकंठ खाडिलकर
प्रकाशक—नी. य खाडिलकर
नवाकाळ प्रेस
किंमत ८ रुपये ¤

# Beyond Friendship च्या विशेषांकाच्या निमित्ते

वि. भा. देशपांडे

'Beyond Friendship' या षण्मासिकाचा जुलै ७४ चा अक लक्षवेधी आहे. 'पदवीपूर्व वर्षातील विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास' हा केंद्रभूत विषय होऊन त्याकडे विविध दृष्टिकोनातून पहाण्याचा प्रयत्न आहे. परिसवाद पद्धतीने एकूण बावीस लेखाचा समावेश या अकात आहे. विषय माडणी तीन भागात केलेली आहे. १. *शैक्षणिकदृष्टचा आणि व्यावसायिकदृष्टचा* मार्गदर्शनपर लेख. २. या वयातील विद्यार्थ्यांची जडणघडण, त्यातील समस्या, शैक्षणिक समस्या या सबधीची चर्चा करणारे लेख. ३. व्यक्तिमत्त्व विकास केंद्राबद्दल कल्पना व उपक्रम.

या अकातील बहुताश लेखाचा विचार गांभीर्याने होणे अगत्याचे आहे. विस्तारभयास्तव ते अशक्य असल्याने फक्त दोनतीन महत्त्वाच्या लेखातील सूत्ररूपी विचारांचा उल्लेख पुरेसा आहे. १. 'महाविद्यालयाच्या उबरठ्यावर' या शिर्षकाचा कमल पाध्ये याचा दीर्घ लेख मननीय आहे. त्यामध्ये महाविद्यालये, विद्यापिठे, त्यांची कार्यपद्धती, ग्रथालये, अभ्यास-परीक्षा पद्धती इत्यादी अनेक गोष्टीचा साक्षेपी ऊहापोह केलेला आहे. या लेखाची मांडणी आणि स्वरूप Bruce Trustcot याच्या 'First year at The University' या पुस्तकावर आधारीत आहे. हे पुस्तक मुळातच वाचण्याचे आवाहन या लेखाने केले आहे. त्यातला एक विचार लक्षात घेण्याजोगा आहे— 'तुमचा विषय किंवा शिक्षणाचे क्षेत्र कुठलेही असो, तुम्ही चौफेर-चौकस नजर फिरवाल, त्यातली गुतागुत सोडवाल आणि ज्ञानाची उकल होत चालली की ज्ञान किती सूक्ष्म आणि व्यापक आहे याची जाणीव तुम्हाला आपोआप येईल. हे ज्ञान चर्चेतून पक्के करण्यासाठी, आत्मसात करण्यासाठी तुम्ही येथे आला आहात एकदा का तुम्ही त्यात गुतलात की विद्यापीठाचा ठसा कायमचा तुमच्या मनावर न कळतच उमटू लागेल. तुम्ही महाविद्यालयात कदाचित चारच वर्षे रहाल. पण या महाविद्यालयीन मूल्यांचा ठसा तुमच्या जीवनावर कायमचा राहील. आणि हेच करण्यासाठी तुम्ही आज या उबरठ्यावर उभे आहात.' २. 'मुलींचं महाविद्यालयातल पहिल पाऊल' या प्रा. अनुराधा पोतदार याच्या लेखात माडलेला एक विचार लक्षात घेण्याजोगा आहे. त्यानी म्हटले आहे की 'मराठी हा विषय पदवीपरीक्षेसाठी घेणारी विद्यार्थिनी लग्न होऊन परप्रांतात गेली तरी कान्व्हेंटमध्ये शिकणाऱ्या आपल्या मुलाना मराठी नीट लिहितावाचता येत नाही हे सागताना तिच्या मनाला कोणत्याच विशादाचा स्पर्श झालेला आढळत नाही... कडक गणवेषांची इस्त्री, बाह्य उपचारातली सफाई आणि इग्रजी वापरातली हुशारी यांनाच अतिरिक्त महत्त्व देऊन, जीवनाची मूल्य मानावी अशा काही मूलभूत गोष्टीकडेच अक्षम्य दुर्लक्ष होतं. आपल्याच हातानी आपल्या भावी पिढीची हानी होते.' ३. विद्या बाळ यानी एक पालक या नात्याने

केलेली सूचनाही विचारात घेण्याजोगी आहे. ' पालक आणि प्राध्यापक या दोन्ही भूमिकाचा चागला समन्वय घडवू शकणारी एखादी लायक स्टुडट कौन्सेलर कदाचित या दिशेन चागला हातभार लावू शकेल. प्रचड विद्यार्थी सख्येमुळे हरवलेला दुवा ती सांधू शकेल. ४. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्राध्यापक काय करू शकतील याचे नेमके विवेचन प्रा. स. शि. भावे यानी केले आहे. आणखीही काही चागल्या लेखाचा आशय लक्षवेधी आहे.

या अकातील बहुतांश सर्व लेखामध्ये पदवीपूर्व वर्गातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्यादृष्टीने काय व्हावे, काय असावे याची प्रामुख्याने चर्चा आहे, मार्गदर्शन आहे. परतु काय असावे सांगताना शिक्षण क्षेत्रातील आजची परिस्थिती काय आहे याचे विवेचन तुलनेने कमी आहे. प्रत्येक लेखकाला आजच्या शैक्षणिक परिस्थितीचे भान निश्चितच आहे—असणार यात शकाच नाही पण ती परिस्थिती गृहीत धरून उपाययोजना सुचविली गेली*तर तिचा वास्तव विचार सद्य:स्थितीला उपकारक ठरेल विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रत्येक महाविद्यालयात विविध उपक्रम आहेत, मडळे आहेत. पण काही महाविद्यालयातील काही उपक्रमाचा अपवाद वगळता या उपक्रमांची अवस्था चिंतनीय आहे. ते सारे उपक्रम निर्जीव आहेत. कारण ते उत्सवी समारभी स्वरुपाचे आहेत. त्यातली क्रियाशीलता, चैतन्य नष्ट झालेले आहे उपक्रमाचे उद्घाटन वर्षात चारदोन नामवतांची (किंवा ओळखवतांची) व्याख्याने, समारोप वगैरे गोष्टी अहवालापुरत्या घडतात. त्यातून निष्पन्न काहीच होत नसते. महाविद्यालयाचा विविध उपक्रमाकडे पहाण्याचा दृष्टिकोन, विद्यार्थ्यांचा उत्साह, मिळणारा प्रतिसाद, सबधित प्राध्यापकाची क्षमता, उपक्रमाला असणारे आर्थिक साह्य आणि वेळ इत्यादी अनेक गोष्टी उपक्रमांच्या अपयशाला कारणी आहेत.

मग प्रश्न असा निर्माण होतो की विशिष्ट विषयावर काढलेल्या अंकाचा आणि त्यात सुचवलेल्या योजनाचा नेमका उपयोग कोणता ? तर या निमित्ताने सबधीत विषयाची चर्चा शिक्षणक्षेत्रात सुरू व्हावी, ज्याना कोणाला नवीन काही उपक्रम करावयाचे असतील त्याना दिशा लाभावी हीच अपेक्षा असते. सपादकानाही यापेक्षा अधिक वेगळे काही वाटत नसावे हे होण्याला देखील महत्त्वाची अडचण म्हणजे अकातील महत्त्वपूर्ण विचार ज्याच्यासाठी आहेत त्या विद्यार्थ्यांपर्यंत व्यवस्थितरीत्या पोचत नाहीत. यावर मी असे सुचवीन की या अकातील काही महत्त्वपूर्ण विचाराचे, लेखांचे साररूप सकलन चक्रमुद्रांकित (सायक्लोस्टाइल) करून महाविद्यालयाकडे पाठवावे. त्यावर *विद्यार्थी-प्राध्यापक-प्राचार्य यानी* विचार विनिमय करून काही निर्णयाप्रत यावे. अकाच्या सपादकानी किंवा सबधितानी महाविद्यालयाशी यथाशक्ती सपर्क साधून काही उपक्रमाना चालना द्यावी. हे एकदा करून भागण्यासारखे नाही. त्याला सातत्य हवे. त्यातूनच एखादी मध्यवर्ती सघटना निघून कार्याला भरीवपण येईल. महाविद्यालये पदवीपूर्व वर्गातील विद्यार्थ्यांच्या व्यितिमत्त्व विकासाला खरोखरीच किती महत्त्व देणार आहेत किंवा देत आहेत ते पहिल्या काही भेटीतच कळून येईल. त्यातून काही मार्ग निघेल. अशा प्रकारचा काही सवाद घडला नाही तर हा परिश्रमपूर्वक तयार केलेला अक नेहमीच्या अकासारखा विस्मृतीत जाईल. तसे होऊ नये म्हणून जरा विस्ताराने लिहिले.

या अकाचे मुखपृष्ठ विषयाच्या दृष्टीने अर्थपूर्ण आहे. छपाई आणि मजकुराची मांडणी आकर्षक आहे. खटकणारी गोष्ट एकच ती म्हणजे अकाचे नामकरण इग्रजी आणि इतर सर्व मजकूर मराठी आहे. मराठी विद्यार्थ्याला षण्मासिकाच्या नावापासूनच जवळीक वाटेल असे काही करता येईल का ? प्रारभी म्हटल्याप्रमाणे एक लक्षवेधी अक काढल्याबद्दल सपादिका कमल पाध्ये आणि त्याचे सहकारी लेखक मित्र याचे मन:पूर्वक अभिनंदन. □

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### दि. १९-१०-७४ ते २५-१०-७४

**मंत्रीमंडळाच्या बदलाचे साद पडसाद**

पंतप्रधान श्रीमती इदिरा गाधी यानी आपल्या मत्रीमडळात नुकतेच जे बदल केले त्याचे साद पडसाद भारताच्या निरनिराळ्या राज्यात उठणार आहेत. अन्नधान्याच्या आघाडीवर खुल्या व्यापाराच्या दृष्टीने पावले पडतील मंदीची प्रसादचिन्हे दिसू लागतील. महाराष्ट्र, बिहार, मध्यप्रदेश, नामिळनाडू येथील कॉंग्रेसमध्ये सघटनात्मक बदल नेतृत्वाच्या दृष्टीने होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्राच्या नेतृत्वात देखील काही बदल होऊ शकेल. लोकाचा असतोष मात्र कमी होऊ लागेल.

**मेष : उद्योगात प्रगती**

आज ललितापचमीच्या शुभ मुहुर्तावर या आठवड्याची सुरुवात होत आहे. आठवड्याशेवटी दसरा येत आहे हा सबध आठवडा प्रामुख्याने तुमच्या उद्योगाला नवे वळण देणारा ठरणार आहे. नोकरीच्या ऐवजी जर उद्योग स्वतत्र धंदा सुरू करावयाचा असेल तर त्याचा मुहूर्त याच आठवड्यात करा. पैशाच्या बाबतीत अनाहूत मार्गाने पैसा मिळेल. नोकरीत श्रमाचे चीज होईल. वरिष्ठाना तुमची गरज भासेल. त्यांच्याबरोबर खास अशा महत्त्वाच्या कामासाठी तुम्हाला प्रवास घडेल. वडीलधाऱ्याची माया व एखाद्या डोळ्यात भरलेल्या तरुणीचे प्रेम लाभेल. दसऱ्याच्या निमित्ताने महिलांना दागिने मिळतील.

**वृषभ : आर्थिक स्वास्थ्य**

आज ललिता पचमी आहे. लक्ष्मीचा सुखद्स्पर्श घेऊन हा आठवडा येत आहे. विशेष करून पैसा आणि व्यावसायिक यश याचे मोठे वरदान तुम्हाला लाभणार आहे. सोमवार, गुरुवार व शुक्रवार हे दिवस अनुकूल आहेत. लॉटरींचे तिकीट या दिवशी

घ्या. रेसच्या मार्गाने पैसा मिळण्याचा योग आहे आठवड्याच्या शेवटी विजया दशमी आहे. तुमचे मनोरथ पुरे होण्यासारख्या सूचक घटना घडतील. नोकरीचे जमावे सार्वजनिक कामात प्रतिष्ठा लाभेल. अनेक दिवसाच्या आर्थिक विवचना दूर होऊन स्वास्थ्य लाभेल., महिलानी आज मुद्दाम उपवास करावा. ससारात त्याना मोठेपण मिळेल.

**मिथून : साराच आनंद**

आयुष्यात काही दिकस वैभवशाली इतिहास घडवून जातात. ते उत्तम व अनुकूल दिवस या आठवड्यात आले आहेत. सुरुवातीला सफलतेचा साक्षात्कार घडवणारी ललितापचमी आणि शेवटी विजयाची दुदुभी गर्जणारा दसरा. तुमचे बौद्धीक तेज माध्यान्हीच्या सूर्यप्रमाणे तळपणार आहे. एखादे उत्तम नाटकाचे कथानक वा कादबरीची कल्पना तुमच्या मनात साकारू लागेल. तुमच्या पुस्तकाचे सरकार दरबारी कौतुक होण्याची शक्यता आहे. नोकरी धद्याची परिस्थिती सुधारणेचीच राहील. बुधवार व शुक्रवार तुम्हाला शुभदायक आहेत. महिलाना नोकरीत मोठा अधिकार मिळेल.

**कर्क : प्रवासाचा योग**

ललितापचमीच्या आजच्या शुभदिनी तुमच्या महत्त्वाकाक्षा सफल होतील ही शुभेच्छा देताना मला आनद होत आहे. साडेसाती असू द्या. पण तुमच्या मनातील अनेक दिवस आकार घेत असलेली एखादी गोष्ट चटकन मनासारखी घडून जाईल. पैसा कीर्ती, प्रतिष्ठा व सत्कार असा योग दिसत आहे. इच्छापूर्ती होणार आहे. एखादा सधन माणूस तुमच्यावर खुश होऊन तुम्हाला बक्षिस म्हणून द्रव्य देऊ शकेल. शुक्रवार व चार हा अक तुम्हाला शुभ आहे. महिलानी लेखनाचा मुहूर्त करावा. त्याच्या हातून चागले लेखन होईल

**सिंह : पुढारीपण मिळेल.**

मित्र हो, मोठा छान योग जमून आला आहे. मांगल्य, प्रसन्नता, सामर्थ्य असे दैवी गुण या आठवडाभर तुमच्या जीवनात रुमझूम करणार आहेत. तुम्ही उपासक नसलात तर तुम्हाला ती भावना होईल. तुम्ही धार्मिक नसलात तर तुमचे परिवर्तन होईल. तुमच्या आचार आणि विचारात मोठे बदल होतील. सार्वजनिक जीवनात पुढारी पणाची मोठी सधी तुम्हाला लाभणार आहे. तुमचे राजकारण पटुत्व कसोटीला उतरेल. नोकरीत अधिकाराचा योग. महिलानी लहान प्रमाणात उद्योग सुरू करावा.

**कन्या : वरिष्ठाची मर्जी**

या महिन्याच्या सुरुवातीला नोकरीत तुम्हाला अपमान सहन करावा लागला होता. पण गेल्या आठवड्यात मोठे बदल होऊन तुम्हाला नोकरीत महत्त्वाचे स्थान मिळाले या आठवड्यात तुमच्या कामावर खुश होऊन वरिष्ठ तुम्हाला दसऱ्याचे सोनेच बहाल करतील. त्यामुळे तुमचा आगामी भविष्यकाळ सुख आणि समृद्धी यानी बहरून निघेल. बेकारांना व स्वतत्र उद्योग करणाऱ्या कॉन्ट्रॅक्टर्सना पैशाची मदत मिळेल. शनिवार शुभ आहे. महिलांनी परीक्षा देऊन कलाक्षेत्राशी सवध ठेवावा.

**तूळ : मित्राची मदत**

अनेक दिवस ज्या एका सधीची आपण वाट पहात होता तो सधी आज अगर उद्या आपणास लाभणार आहे. या आठवड्यात सर्वच दिवस मागल्याने भरलेले आहेत. नोकरीच्या दृष्टीने तुमच्या आशाआकाक्षा दृष्टिपथात याव्यात. अनेक प्रकारची कामे यश घेऊन पुरी होतील. निवडणूक अगर अशाच स्पर्धात तुम्हाला यश लाभणार आहे. यावेळी तुम्हाला मित्राचे सहकार्य लाभणार आहे महिलाना जवळपासचा प्रवास घडेल.

**वृश्चिक : अधिकार प्राप्ती**

या आठवड्या अखेर विजयाची तुतारी फुकीत दसरा येत आहे. मित्र हो, निराशा आणि आळस टाकून इच्छा पूर्तीच्या दिशेने सीमोल्लघन करा. नोकरी व्यवसाय, व्यापार इत्यादी आघाडीवर भरघोस विजय मिळणार आहे. शेत जमिनीच्या खरेदीच्या व्यवहारात फायदा होईल. नोकरीत मागील मुदतीपासूनचा पगार मिळणार आहे. प्लॅस्टिक अगर तावे याच्यासारखा व्यापार करा. महिलांनी नोकरीची सधी गमावू नये. त्यांना लॉटरीचे बक्षिस लागेल.

**धनू : समाधान गवसेल**

मित्र हो, तुमचा अनिष्ट काळ आता इतिहास जमा झाला आहे. दसऱ्याच्या मगलमय सणाचे सामर्थ्य घेऊन येणारा हा आठवडा तुमच्या मनाला शारदीय चांदण्याची प्रसन्नता आणणारा आहे. आता चिंता कशाची करता ? व्यवसाय असो वा नोकरी असो, कारखाना असो की डॉक्टरी असो, प्रत्येक क्षेत्रात काही तरी नवीन घडेल. पैसा आणि प्रतिष्ठा मिळणार आहे. तुमच्या कर्तबगारीला नवे आव्हान मिळणार आहे. महिलाच्या कलात्मक गुणाना सुवर्णसधी लाभणार आहे.

**मकर : आत्मसाक्षात्कार**

दैवी शक्तीचा साक्षात्कार तुम्हाला या आठवड्यात होणार आहे. कारण ललिता पचमी ते दसरा या मगलमय कार्याने हा आठवडा भरला आहे. तुम्ही हेतू साध्य होण्यासाठी आपल्या कुलदेवतेची आराधना करा. सर्वच क्षेत्रात विजयाची माळ तुमच्या गळयात पडणार आहे. नोकरी धद्यात नवे नवे सकल्प सफल होत जातील. व्यवसायातील अडचणी दूर होऊन प्रगतीचा मार्ग सापडेल. रेस–लॉटरीच्या मार्गाने धन दौलत लाभेल. महिलांना छोटा उद्योग सुरू करता येईल. पैसा मिळेल.

**कुंभ : मनोरथ पूर्ण होतील**

तुमचे आर्थिक जीवन सुस्थिर नाही. त्यामुळे तुम्ही असमाधानी आहात पण हे असमाधान या आठवड्यात अजिबात शिल्लक रहाणार नाही. आठवड्याची सुरुवात व शेवट मंगलमय आहे श्रमाशिवाय पैसा तुमच्या नशिबी आहे. सोने मिळण्याचा छान योग तुम्हाला आहे दुसरी महत्त्वाची घटना या वेळी घडेल. म्हणजे नोकरीच्या निमित्ताने तुम्हाला परदेशी जाण्याची दुर्मीळ सधी मिळणार आहे तुम्ही लेखक असाल तर वैचारिक लेखन होऊ शकेल. महिलांच्या हातून उत्कट असे ललितलेखन घडू शकेल.

**मीन : आनंदाची चाहूल**

बारावा गुरू आहे म्हणून मागे रेंगाळत बसू नका. कर्तृत्वाचा मार्ग तुमच्या समोर उभा आहे. आळस सोडून समोरचे आव्हान स्वीकारा. तुम्ही पदवीधर असाल तर सरकारी मदत बिनधास्त तुमच्या पदरी पडून तुमच्या आवडीचा धंदा या आठवड्यात तुम्हाला सुरू करता येईल. प्रकाशनाचा स्वतत्रपणे धदा सुरू करता येईल. औषध विक्री, वकिली डॉक्टरी, खते, पुस्तक विक्री इत्यादी धदे फायदा मिळवून देतील. काही तरी उत्साहवर्धक घडावे. महिलांनी कलाक्षेत्रात पदार्पण करावे. त्यांच्या गुणाचे चीज होईल.

☐

सन्मती नर्सिंग होम अॅम्ब्युलन्स फंड, माढा (जिल्हा सोलापूर) या संस्थेस मिळालेल्या मेटॅडोर अॅम्ब्युलन्सचा उद्घाटन समारंभ माढा येथे ५ ऑक्टोबरला साजरा झाला.

# मुंबईची 'संजीवनी' माढयाच्या 'सन्मती'ला मिळाली

सुरेश शहा, कुर्डुवाडी

सर्वसाधरणपणे एम् बी. बी. एस. झालेले तरुण ग्रामीण भागात वैद्यकीय व्यवसाय सुरू करण्यास सहसा तयार होत नाहीत. आपल्या डिग्रीच्या जोरावर ते एखाद्या शहरात व्यवसाय सुरू करून त्यायोगे आपले भावी आयुष्य सुखी करण्यातच रमून जातात. असे असताना डॉ. रमणलाल दोशी यानी मात्र एम्. बी. बी. एस. होताच मुद्दाम माढ्यासारख्या एका लहानशा गावात आपला वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. केवळ पैसे मिळविणे हेच आपल्या आयुष्याचे ध्येय न मानता मानवतेची सेवा करण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन ग्रामीण भागातील दुःखी, पीडित व निराधार, गरीब जनतेला वैद्यकीय सोय अल्प मोबदल्यात—प्रसगी मोफत उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने माढा गावाची निवड केली. माढा हे गाव साधारण ७–८ हजार लोकवस्तीचे तालुक्याचे ठिकाण असूनही फारशी सुधारणा नव्हती. हॉस्पिटलची जवळपास सोय नव्हती. गावात एकही वाहन नव्हते. माढयाच्या परिसरात ३० ते ४० खेडी. प्रत्येक खेडे हे ३ ते ५ मैल अतरावर गरीब लोक. फारसे उद्योग धदे नसल्याने पैसे मिळविण्याचे साधन नाही. अशा परिस्थितीत आजारपण म्हणजे लोकांना सकट वाटे. वाहनांची सोय नसल्याने सिरियस केसेस व अडलेल्या बाळतपणाच्या केसेसचे फारच हाल होत. रस्ते खराब, त्यात पावसाळ्याचे ४ महिने तर खेडोपाड्यातील लोकांना वैद्यकीय मदत मिळविणे अशक्य होई.

या परिस्थितीवर मात करीत डॉ. दोशीनी पाच वर्षे आपल्या ध्येयाने प्रेरित होऊन घालविली. वाहनाशिवाय खेड्यातील रुग्णाना तातडीची मदत होणे अशक्य हे जाणून दिनाक ३० ऑगस्ट, १९६५ रोजी डॉक्टरानी आपल्या मित्रमडळीच्या सहकार्याने 'सन्मती धर्मार्थ फड' या नावाची सस्था स्थापन केली. निरनिराळ्या औषध कपन्या व इतर कंपन्याना धर्मार्थ निधी देण्यासाठी दररोज २०० ते ३०० विननी पत्रे लिहिली जाऊ लागली. ठिकठिकाणाहून या पत्राना चागलाच प्रतिसाद मिळत गेला. अल्पावधीत रु. ५ हजार जमा झाले.

अॅम्ब्युलन्सची गरज लक्षात घेऊन एक जुनी जीप खरेदी करण्यात आली. रुग्णाच्या मदतीसाठी ही जीप खेड्यापाड्यातील रस्त्यावर धावू लागली. जीपमुळे अनेकाचे जीव वाचले. या भागातील रुग्णाना जीपमुळे 'सजीवनी' च प्राप्त झाल्यासारखे वाटू लागले. पुढे यातूनच 'सन्मती नर्सिगहोम अॅम्ब्युलन्स फड' नावाची सस्था स्थापन करण्यात आली. सस्थेची कायदेशीर घटना तयार करून दि. १–७–१९६७ रोजी सस्था रजिस्टर करण्यात आली.

माढयाच्या आसपासच्या खेड्यातील जनता गरीब व मध्यमवर्गीय असून त्यांच्या उत्पन्नाची साधने अपुरी असल्यामुळे त्यांना प्रसंगी ३० ते ४० मैलावरील हॉस्पिटलमध्ये जाऊन रोग्यांवर उपचार करणे हे त्याच्या कुवतीबाहेर जाते. हे जेव्हा डॉक्टराच्या वारवार दृष्टोपत्तीस येऊ लागले तेव्हा माढा येथे सर्व सोयीनी सुसज्ज असे एक धर्मार्थ हॉस्पिटल काढावे असा धाडसी विचार डॉक्टराच्या मनात आला आणि त्यानुसार कार्याची वाटचाल सुरू झाली.

हॉस्पिटलसाठी हरिजन समाजाची २ एकर जागा कूळ व मालक याच्या सहकार्याने मिळवून या कामाचा श्रीगणेशा करण्यात आला. गावातील भाडोत्री जागेमध्ये सस्थेच्या विद्यमाने अल्प मोबदल्यात औषधोपचार करण्यासाठी सस्थेचे एक आधारस्तभ डॉ. फुलचद दोशी यानी आपल्या मातापित्यांच्या स्मरणार्थ दिलेल्या प्रमुख देणगीमधून 'राजुबाई औषधालय' हा बाह्य रुग्ण विभाग सुरू करण्यात आला.

'सन्मती 'चे खास वैशिष्टय म्हणजे केवळ विनतीपत्रातून केलेल्या मदतीच्या आवाहनास मिळालेल्या जबरदस्त प्रतिसादातूनच ही सस्था उभी रहात गेली. हॉस्पिटलच्या बाधकामासाठी पत्रकाने मदतीचा ओघ सुरू झाला. सस्थेकडे जवळ जवळ रु. १६ हजार जमा झाले. दि. २०–१०–१९६८ रोजी पाडव्याच्या शुभ मुहुर्तावर भूमिपूजन समारभही पार पडला.

बाधकाम करण्यासाठी जवळपास पाण्याची भरपूर सोय नसल्याने सोलापूर वेल सर्व्हिस या सस्थेने विनामूल्य चार इचाचे १२० फुटाचे बोअर करून देऊन हॉस्पिटलच्या पाण्याचा प्रश्न पूर्ण केला. पाया खोदाईचे व भरणीचे काम गावातील प्रतिष्ठित नागरिकानी व विद्यार्थ्यानी पूर्ण केले. याच सुमारास जर्मनीमधील 'मिसेरर' या जागतिक रोगनिवारण सस्थेकडून हॉस्पिटलच्या बांधकामासाठी रु. ४० हजाराची बहुमोल अशी देणगी पत्रक द्वारेच मिळाली. यातून इमारतीच्या बाधकामास द्रुतगतीने चालना मिळाली. याचप्रमाणे पत्रकाना व पत्राना प्रतिसाद देऊन पुढील सस्थाकडून हॉस्पिटलच्या उभारणीसाठी देणग्या मिळत गेल्या. त्या येणेप्रमाणे– श्री. दोराबजी टाटा ट्रस्ट मुबई रु. ५०००|–, वालचद इडस्ट्रीज चारिटेबल ट्रस्ट

मुबई रु. ५०००।–, रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब पूना रु. २५०००।–, केंद्र सरकारकडून रु. ११२५०।– व माढा तालुका पचायत समितीकडून रु २०००।– पुढे अपुरे राहिलेले पण अत्यत जरुरीचे बाधकाम पूर्ण करण्यासाठी वालचद इडस्ट्रीज ट्रस्ट मुबई याच्याकडून रु. २५०००।– चे दीर्घ मुदतीचे कर्ज मिळविण्यात आले. या सर्वांच्या मदतीच्या आधारावर हॉस्पिटलची वास्तु हळुहळू साकार झाली.

हॉस्पिटलच्या नव्या इमारतीत आता रुग्ण सेवेचे काम अहोरात्र चालू आहे. 'सन्मती'च्या बाह्य रुग्ण विभागात दोन डॉक्टर पूर्ण वेळ काम करतात. याशिवाय दर रविवारी व मगळवारी सोलापूरहून नेत्ररोग तज्ज्ञ, कान, नाक, घसा तज्ज्ञ, स्त्री रोग तज्ज्ञ, फिजिशियन, पॅथॉलॉजिस्ट व जनरल सर्जन अशी डॉक्टर मडळी हॉस्पिटलमध्ये येऊन अल्प मोबदल्यात सल्ला देण्याचे व उपचाराचे काम करतात. या सेवेसाठी सस्थेकडे सर्व सोयीनी व साधनानी सुसज्ज असे ऑपरेशन थिएटर आहे. सस्थेच्या बाह्य रुग्ण विभागात दररोज ८० ते १०० रुग्ण उपचारासाठी येतात. त्यापैकी सुमारे २५% रुग्णावर मोफत व ५०% रुग्णांना केवळ औषधाच्या किमतीत उपचार केला जातो. सस्थेमध्ये कुष्ठ रोगावर मोफत इलाज केले जातात याशिवाय धनुर्वात, ट्रिपल याची इंजेक्शन्स, पोलिओ प्रतिबधक डोसेस, अन्न सत्वाच्या गोळ्या, सतती नियमनाच्या गोळ्या मोफत दिल्या जातात, या सर्व कार्यासाठी वेळोवेळी निरनिराळ्या औषध कपन्याकडून व प्रतिवर्षी इडियन रेड क्रॉस सस्थेकडून औषधे मिळतात.

माढ्यातील जनतेच्या सोयीसाठी उपलब्ध असलेल्या १-२ एकर जागेत बालोद्यानाची सोय केली आहे. बालोद्यानामध्ये लहान मुलाच्या खेळांची साधने उपलब्ध आहेत. लगतच एक बगिचाही उभारला आहे. या सोयीचा गावातील नागरिक, मुले व रुग्ण फायदा घेतात.

माढ्यासारख्या ग्रामीण भागातील बहुसख्य गरीब जनताच या हॉस्पिटलचा प्रामुख्याने फायदा घेत असल्यामुळे आणि संस्थेकडे कायम स्वरुपाचे उत्पन्नाचे कसलेही साधन नसल्यामुळे सस्थेच्या वाढत्या पसाऱ्याचा दैनंदिन खर्च भागविण्यासाठी व जमाखर्चाची तोड मिळवणी करण्यासाठी प्रतिवर्षी सस्था चालकांना आश्रय दात्याच्या शोधात रहावे लागते.

नेहमीप्रमाणे आश्रयदात्याचा शोध घेत असतानाच दि. १३ मे १९७३ रोजी पुण्याच्या रविवार सकाळमध्ये श्री. अनील टाकळकर याचा 'मेजवान्यात उरणारे अन्न गरिबाच्या तोंडी घालणारे मेहता कुटुब.' हा लेख रमण दोशीच्या वाचण्यात आला......

आणि डॉक्टरांना 'सजीवनीच' गवसली. डॉक्टराचा टाईपरायटर रात्री अपरात्री खडखडू...लागला... मेहता कुटुबावर विनती पत्राचा वर्षाव सुरू झाला. 'सजीवनी ट्रस्टच्या' हास्यचद्र मेहतानी आपण्या स्वभावानुसार डॉक्टराच्या पत्राची ताबडतोब दखल घेऊन 'सन्मतीचा' अधिक परिचय करून घेण्याची उत्सुकता दर्शविली. डॉ. रमण दोशी मेहताच्या निमत्रणानुसार मुबईस गेले असता तेथे श्री. मेहतांनी त्याचे 'सन्मीत्र' पॅंटेगॉन चारिटेबल ट्रस्टचे श्री. शातीलाल भाई मेहता यांचा डॉक्टराना पपरिच करून देऊन त्याच्याकडून सस्थेस अत्यावश्यक असलेली डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी लागणारी हत्यारे घेण्यासाठी रु. ९०००।– मिळवून दिले. तसेच सस्थेच्या पाण्याच्या सोयीसाठी इलेक्ट्रिक मोटर व पप यासाठी रु. ११५००।– चीही आणखी देणगी मिळवून दिली.

याच सुमारास सस्थेस अत्यत निकडीची गरज असलेल्या ॲम्ब्युलन्ससाठी मुबईच्या श्री. 'दोराब टाटा ट्रस्ट'ने रु. १५०००।– देण्याची तयारी दर्शविली ही वार्ता मेहतांच्या कानी घालताच त्यानी तात्काळ स्वत: रु. १००००:– इष्ट मित्राकडून रु. १००००।– व कमी पडलेले रु. १६०००।– 'पॅरेगॉन'चे श्री. शातीलालभाई मेहता याचेकडून मिळवून दिले. ॲम्ब्युलन्ससाठी लागणारी रक्कम जमा झाली. परतु पेट्रोल महाग झाल्यामुळे मेट डिझेलची मेटॅडोर ॲम्ब्युलन्स गाडी किमान दोन वर्षे मिळत नसल्यामुळे मोठा प्रश्न उभा राहिला बजाज टेम्पोचे प्रमुख मालक श्री. एच के. फिरोदिया यांनी सस्थेची निकड लक्षात घेऊन सहानुभूतीने महिनाभरात गाडी देण्याची व्यवस्था केली.

आणि...... मुबईची 'सजीवनी' माढ्याच्या 'सन्मती'स मिळाली. हॉस्पिटलमध्ये जास्तीत जास्त रुग्णांची सोय होण्याच्या दृष्टीने सस्थेस–

१. एक्सरे मशीन, २. पॅथॉलॉजी युनिट, ३. मॅटर्निटी वॉर्ड, ४. जनरल वॉर्डस्.

या गोष्टीची अत्यत जरूरी असल्याने समाजातील दानशूर मंडळी नेहमीप्रमाणेच पुढे सरसावून हॉस्पिटलच्या या गरजा लवकरात लवकर पूर्ण करतील असा दांडगा आशावाद डॉ. रमण दोशीना वाटतो. □


## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : **छत्तीस रुपये**

सहामाही : **वीस रुपये**

परदेश : (जलमार्गे)

**पंचावन रुपये**

# तीन, चार, पाच ऑक्टोबर : संपूर्ण बिहार बंद – पृष्ठ ७ वरून

## रेल्वे पूर्ण बंद

रेल्वे लाईन चालू ठेवण्याची सरकारी घोषणा पोकळ ठरली. कलकत्त्याकडे जाणाऱ्या, आसामकडे जाणाऱ्या व बिहारमधील अंतर्गत रेल्वे मार्ग पूर्णपणे बंद पडले होते. बिहारची सीमा सुरू होते त्या स्टेशनपासून पुढे सर्वत्र निरनिराळ्या ठिकाणी रेल्वेगाड्या रस्त्यांतच होत्या. रेल्वे रुळावर मैलागणीक हजारो, स्त्री-पुरुष-मुले बसून राहिली होती. त्या सर्वांना दूर करण्या इतके पोलीस सामर्थ्य राहिलेले नव्हते. गया जिल्ह्यात बिहारच्या सरहद्दीवरील कर्मनाशा रेल्वे स्टेशनपर्यंतच्या ऐंशी मैलावर १०७ ठिकाणी लोक बसून राहिले होते. मुझफरपूर, मुंगेर, समस्तीपूर, इ. जिल्ह्यात महत्त्वाच्या रेल्वे मार्गावरील स्टेशन्सना लोकानी घेराव करून कुलपे लावली. अनेक ठिकाणी रेल्वे कामगारांनी विशेषत. इंजीन ड्रायव्हर, फायरमन इ. नी रेल्वे चालविण्याचा धोका पत्करण्यास नकार दिला व लोकानी इंजीनचे बॉयलर बद केले. रेल्वे बद झाली ती घातपातानी नव्हे तर लोकांनी निश्चयपूर्वक धरणे देऊनच ती बद पाडली. हजारोंच्या सख्येने लोक या कार्यक्रमात सहभागी झाले होते. सर्व बिहारभर बद उत्स्फूर्त होता. टेलिफोन, रिझर्व बँक या कचेऱ्यातील कर्मचाऱ्यानी संघर्ष कार्यालयात फोन करून 'एक तरी स्वयसेवक पाठवा, म्हणजे आम्ही बाहेर पडू.' अशी विनंती केली. सपावर न येण्याबद्दल टेलिफोन कर्मचाऱ्याचे मन वळवावे लागले तर रिझर्व बँकेचे लोक थोडावेळ वाट पाहून आपणहूनच बाहेर पडले. पाटण्यात जी. पी. ओ. चे दरवाजे बद होते. आत गेलेले कर्मचारी स्वस्थ बसून होते. पहिल्या दिवशी बंदला उत्स्फूर्तपणे साथ मिळाल्याचे दिसून आले तरी सर्व राज्यात तीन ठिकाणी गोळीबार होऊन त्यात दोन जण मृत्यू पावले. त्रिवेणीगज, एक्क्या व मसरख येथे पहिल्या दिवशी गोळीबार झाले. सप–हरताळाचे प्रचड यश पाहून गफूरमियाँनी पत्रक काढले, 'लोक संपावर आहेत ते भीतीमुळे, सहानुभूती म्हणून नव्हे!' बिहार सरकारच्या बथ्थडपणाचा हा पुरावा. छात्र सघर्ष समितीने, जनसघर्ष समितीने व स्वत: जयप्रकाशजीनी लोकानी व्यक्त केलेल्या अभूतपूर्व पाठिंब्याबद्दल आभार मानले व अशाच प्रकारे पुढील दोन दिवस बद यशस्वी होईल असा विश्वास व्यक्त झाला.

## जनताद्रोही उजवे कम्युनिस्ट

बदचे प्रचड यश पाहून गफूरमियाँ गर्भगळीत झाले. जनतेसमोर जाऊन चळवळीपासून तिला परावृत्त करण्याची काँग्रेसवाल्यांची घोषणा कागदावरच राहिली! तोड दाखविण्याचीसुद्धा त्यांना कोठे हिंमत झाली नाही. दुसऱ्या दिवशीच्या बद नंतर हीच स्थिती सर्व राज्यभर होती. पण इतका भव्य, शाततापूर्ण असा जनतेचा निर्धार कलंकित करण्यासाठी चार तारखेला रात्री मुख्यमंत्र्याच्या हजेरीत व उजव्या कम्युनिस्टाच्या पुढाकाराखाली हा कट रचण्यात आला. पाच तारखेचा दिवस उजाडला तेव्हाच आज शेवटच्या दिवशी काहीतरी होणार अशा अफवा हवेत होत्या. उच्चपदस्थ काही जाणकारानी काँग्रेस-कम्युनिस्टाच्या गुप्त बैठकीत काय शिजले त्याची माहिती जयप्रकाशजीच्याकडे पोचविली होती. काय घडणार याची पूर्व चिन्हे दिसली होती. पाच तारखेच्या 'आर्यवर्त' या हिंदी दैनिकाने (पाटणा) एक वृत्त प्रसिद्ध केले होते. ४ तारखेला छप्रा जिल्ह्याचे आयुक्त पताही विमान धावपट्टीच्या बाजूने परत येत असताना त्यांच्या गाडीवर विटाचा मारा करण्यात आला. त्याच्या बरोबरच्या सरक्षक तुकडीने दगडफेक करणाराचा पाठलाग करून जे चार लोक पकडले ते सर्व उजव्या कम्युनिस्ट पक्षाचे सभासद असल्याचे आढळून आले! पाच तारखेलाच पाटण्यात आणखी एक घटना घडली. शहरातील गुल्वार भाग विभागात पोलिसानी काही बाँब पकडले व त्या प्रकरणात ज्यांना अटक केली ते सर्वजण दिल्लीहून आलेले उजव्या कम्युनिस्ट पक्षाचे सभासद होते असे तपासात निष्पन्न झाले. पाच ऑक्टोबरला शेवटचा बद दिवस होता. सपूर्ण बदचे यश लक्षात घेऊन लोकाचा त्रास कमी करण्याचे हेतूने सध्याकाळी सहानतर दुकाने उघडण्याची परवानगी सघर्ष समितीने दिली होती. सायकलरिक्षाही सध्याकाळी पाच नतर चालविण्याची मुभा होती. बदच्या तिसऱ्या व शेवटच्या दिवशी पहिल्या दोन दिवसाच्या यशाने आनंदीत, उत्साही झालेली जनता एखाद्या जत्रेच्या स्वरुपात सचिवालयाजवळ जमली होती. कोठे भाषणे सुरू होती. कोठे आंदोलनकी कविताएँ सुरू होती. मध्येच एखादा कर्मचारी सशयास्पद रीतीने गेटच्या जवळपास दिसला तर त्याला घेराव होत होता. असे सर्व वातावरण होते. सभा सपवून लोक घरी परण्याचे तयारीत होते. इतक्यात अफवा पसरली की पटनासिटी या उपनगरात गोळीबार होऊन अनेक लोक मारले गेले आहेत व सध्याकाळी सहा पासून सर्व शहरभर कर्फ्यू सुरू आहे पाटनासिटीस पाच तारखेला सकाळी सात ते दहा हजार लोक रेल्वेलाईनवर बसून राहिले होते. जिल्हाधिकारी व इतर पोलीस अधिकारी सकाळपासून काहीसे बेफाम, कडवट बनल्याचे दिसून येत होते. सकाळी ९ च्या सुमारास भाषण करतानाच जयप्रकाशजीनी आदल्या दिवशी शिजलेल्या कटाचे सदर्भात सत्याग्रहीना व लोकांना इशारा दिला होता की, 'अतिशय सयम राखा. तुम्हाला भडकविण्याचे प्रयत्न होतील. सावध रहा' थोड्याच वेळात त्याना मुख्यमत्र्याचे मार्फत निरोप आला की पटनासिटीत तग वातावरण आहे. लक्ष द्या. जयप्रकाशजीनी नारायणभाई देसाई याना तिकडे पाठविले. ते पोचेपर्यंत पहिली गोळीबाराची फैर झडली होती. लोक सागत होते, 'आम्हाला अटक करा, आम्ही सत्याग्रही आहोत, तुरुंगात जाण्यासाठी आलो आहोत' संपूर्ण शांततेने चाललेल्या या धरणा सत्याग्रहात अधिकारी पोचले व 'पाच मिनटात रेल्वेलाईन खाली करा' असे फर्मान त्यांनी काढले. लोकांना पकडण्याचे त्यानी नाकारले. लाठीमार, नतर अश्रुधूर. काही दगड आले व त्याबरोबरच बऱ्याच दूर अतरावर असलेल्या रेल्वे केबिनमधून धूर दिसू लागला केबिनमनने नतर सांगितले, 'कोई विद्यार्थी नही आया, कुछ

सियाने लोग आये और आग लगाकर चले गये ' धूर दिसताच गोळीबाराचा हुकूम झाला. चार लोक जागेवरच मेले. अनेक घायाळ झाले. मग सी. आर. पी चा नंगा नाच सुरू झाला. वैद्यकीय महाविद्यालयातील एका विद्यार्थ्यांचे पायावरून त्यांची जीप गेली. त्याचा पाय मोडला. घरात असलेले लोक मारले गेले. किती लोक मेले याचा नक्की अंदाज कोणालाच करता येईना. जवळच्या तलावात काही प्रेते फेकली. रेल्वे इंजिनच्या भट्टीत काहींना झोकले. मालगाडीच्या डब्यात प्रेते बंद करून ठेवली. चाळीसच्यावर जखमी हॉस्पीटलमध्ये दाखल झाले. ' शांततामय बंद कलंकित करण्यासाठी रचलेल्या कटाचा हा भाग आहे व याची जबाबदारी गफूरमियाँ व त्यांचे कम्युनिस्ट भाईबंद यांचीच आहे ' असे स्पष्टपणे जयप्रकाशजींनी म्हटले. गोळीबार झाला पटनासिटीत. सदर घटना महानगरपालिकेच्या हद्दीत ती कशासाठी ? प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी, कटाचा पुरावा नष्ट करण्यासाठी, अशी सार्वत्रिक प्रतिक्रिया होती.

तीन दिवसाचा अभूतपूर्व बंद ५ ला संध्याकाळी या दुःखद प्रसंगाने संपला. या तीन दिवसातील गोळीबारात १३ लोक–त्यातील अनेक कुमार व युवक–मृत्यू पावल्याचे सरकारी पत्रक निघाले आहे. सत्य निराळे असू शकेल. पण बिहारची जनता ज्या वज्रनिश्चयाने या आंदोलनात उतरली आहे तिच्यावर याचा परीणाम काडीचाही झाला नाही. तिचा निर्धार अधिक पक्का झाला आहे. आत्मविश्वास द्विगुणीत झाला आहे. स्वातंत्र्याच्या लढाईत किंवा त्यानंतरच्या सत्तावीस वर्षात असा अभूतपूर्व ७२ तासाचा बंद कधीच झाला नव्हता. खरे म्हणजे बिहारमध्ये सरकारच राहिलेले नाही. शेकडो गटविकास कचेऱ्यांना कुलपे आहेत. सरकार म्हणजे पुलीस इतकेच शिल्लक आहे. बिहारी पोलिसांचे वरती सरकारचा विश्वास राहिलेला नाही. म्हणून सी. आर. पी. व बी. एस. एफ ! कायदा सुव्यवस्था नावालाही नाही. तुरुंगात मुंगीलाही जागा नाही. साडेतीनशे सत्याग्रहींचे बरोबर फक्त ४ पोलीस व एक सबइन्स्पेक्टर ! तुरुंगात जागा नाही म्हणून सर्वांना तीन-चार तुरुंगात फिरवून कोणीच घेईना म्हणून सोडून दिले ही अवस्था आहे. कायद्याला किंमत नाही. एकट्या पाटण्या शहरात शेनशे पन्नास ' मॅजिस्टर ' निर्माण करण्यात आले ! बिहारी जनतेने त्यांना सार्थ नाव दिले ' जपानी मॅजिस्टर ! ' सहा तारखेला गांधी मैदानावर जयप्रकाशजींची सभा झाली त्याला तीन लाखाहून अधिक लोक उपस्थित होते. निर्भय झालेली जनता आता प्रतिसरकारच्या दिशेने जाऊ लागली आहे. तिला थोपविण्यासाठी फार रक्तपात करावा लागेल. सबंध बिहार ज्वालामुखीसारखा झाला आहे. त्याच्या तप्त लाव्हा रसात दिल्ली होरपळून निघेल. बिहारची धग शेजारच्या उत्तर प्रदेशात, मध्य प्रदेशात इतकेच नव्हे तर दक्षिणेत केरळपर्यंत पोचली आहे. पण विवेकभ्रष्ट राज्यकर्त्यांची स्थिती विनाशकाले विपरीत बुद्धी अशी आहे ! बिहारची जनता आव्हान देऊन उभी आहे : ' दम है कितना दमन मे तेरे देख लिया है, देखेंगे ! □

---


**शुक्रवार ता. १८ पासून सुरू आहे**

" बर्लिन फिल्म फेस्टीवल " साठी

भारतातर्फे पाठविलेली अनुपम कलाकृती

**निलायम ❊ वेस्टएंड**

रोज ३।। ६।। ९।।     रोज ३।। ६।। ९।।

निर्माते

**मोहन जे. बिजलानी • फ्रेनी एम. वरिआवा**

कथा व दिग्दर्शक

**शाम बेनेगल**

ब्लेझ फिल्म एंटरप्राइझेस प्रा. लि.
सादर करीत आहे

**अंकुर**

(ईस्टमन कलर)

कलाकार : **शबाना अझमी; साधु मेहेर; अनंत नाग; प्रिया तेंडूलकर**

संवाद : **पंडीत सत्यदेव डुबे व अझीझ क्वासी** • संगीत : **वनराज भाटिआ** • कॅमेरामन : **गोविंद निहलानी**


---


# चकनाचूर

भाऊ पाध्ये

## ‘ सोंगाड्या ’ यशाने दादाच्या आंधळ्या गुणांना मारला डोळा !

‘ आता लोकनाट्याच्या क्षेत्रात मीच आहे ’ ‘ विच्छा ’च्या यशानंतर दादा म्हणायचा. यात काही रास्त अभिमान होता तरी यशाचा गर्व होता. एक गोष्ट त्यावेळी लोकनाट्यामध्ये दादाला खुले मैदान मिळाले होते. शाहीर अमर शेख वारले होते— तोच अभिमान आणि गर्व दादाच्या ‘ सोंगाड्या ’च्या यशानंतही वाटचाला आला. ‘ सोंगाड्या ’ लागला त्यावेळीही मराठी चित्रपटसृष्टीत दादाला असेच खुले मैदान मिळाले. लोकनाट्यामध्ये साहित्यिक वसंत सबनीस यांनी संवादातील चटपटीतपणा आणला होता. तोच त्यांनी ‘ सोंगाड्या ’मध्ये आणला होता. दादानेही आपल्या लोकनाट्यामधील खास लकबी या चित्रात आणल्या. दादाला सिनेमाचे वेड होतेच आणि ‘ विच्छा ’चा पैसाही जवळ होता. ‘ सोंगाड्या ’चा जुगार तो खेळला आणि जिंकला- ‘ सोंगाड्यामध्ये एक प्रवेश आहे, ज्यावेळी दादा तमाशापटाच्या मागे मेकप करीत बसलेला असतो त्यावेळी तो स्वस्थ बसत नाही, त्याचं अंग सारखं हालत असतं. मी दादाला मानलं ते याच प्रवेशामुळे. हा इथे असा अॅक्टर होता जो पडद्यावर काहीतरी करीत होता. चलच्चित्रपट माणसाने पडद्यावर काहीतरी करावे यासाठीच निर्माण झाला होता. चार्ली चॅप्लीन पासून जॅक तातीपर्यंत प्रत्येक विनोदी नटाने पडद्यावर काहीतरी केले आहे. त्यामुळेच त्यांची चित्रे अद्यापही पहावीशी वाटतात.

दादा आणि मी ‘ विच्छा ’पूर्वीही लॉरेल हार्डीच्या पिक्चर्सना जायचो. लॉरेल-हार्डींनी केलेला स्लॅपस्टिकचा आविष्कार पाहून दादा मला म्हणायचा, ‘ असंच मला काहीतरी करायचं आहे. ‘ सोंगाड्या ’नंतर दादाने ‘ एकटा जीव सदाशिव ’ दिला तेव्हा मी त्याच्याबद्दल निराश झालो. दादाने त्या चित्रात चक्क अॅक्टिंग करण्याचाच प्रयत्न केला होता. सबनीसांच्या साहित्यिकी कोट्या आणि राम कदम यांचे संगीत याशिवाय त्या चित्रात काहीच नव्हते. एकूणच त्या चित्रामध्ये मला काहीतरी लॉरेल-हार्डीसारखं करायचंय ’ असं म्हणणारा दादा स्लॅपस्टिक कॉमेडीपासून खूप दूर गेल्यासारखा वाटला मला. ‘ आता मला लॉरेल हार्डीसारखंच काहीतरी



**आंधळचा दादा कोंडकेला यशाने डोळा घातल्यावर–**

करायचंय ' अशी भाषा दादाने करण्याचे सोडून दिले असावे असेच मला आता वाटू लागले होते. तो त्यावेळी आपल्या डोळ्यासमोरच्या ' मंझील ' पेक्षा जास्त पोलिटिक्सच बोलत असे. शिवसेनेशी त्याने जो ऋणानुबंध जोडला होता, त्यामुळे तो एकप्रकारे ' रॉंग बॉक्स 'मध्ये उभा होता. तो साऱ्या मराठी फिल्म इंडस्ट्रीला वाचवण्याची बकवास करायचा, त्यावेळी कोल्हापूरच्या ऊसवाल्यांना आणि कांदे-बटाटेवाल्यांना वाचवण्याचा त्याचा हा शहाजोग आव मला साफ नामंजूर व्हायचा आणि मी त्यावेळी त्याच्या हिरोगिरीवर सडकून टीका करायचा. मला वाटतं मराठी फिल्म इंडस्ट्री मरायचीच असेल तर ती आपल्या मरणाने मरेल. दादाने उगीच तिला खांद्यावर उचलून घेण्याच्या गप्पा (अर्थात शिवसेनेच्या नादाने) करू नयेत असं माझं स्पष्ट मत होतं. दादाने आपले सिनेमे पहावेत आणि आपल्या अंगभूत विनोदी अभिनयाचा आविष्कार ज्या तंत्राने होऊ शकेल ते तंत्र शोधून काढावे हेच माझे मत होते. चार्ली चॅप्लिनने हेच केलं. जॅक तातीने हेच केलं. पीटर सेलर्स यानेही हेच केलं.

त्यानंतर दादाचे ' आंधळा मारतो डोळा ' हे चित्र. तसे हे चित्र मा. भगवान यांच्या ' अलबेला 'ची स्टोरीच नवा ग्रामीण आकार घेऊन आले होते. अर्थातच दादाने एखादी जुनी कथा निवडल्याबद्दल आपली तक्रार नाही. अगदी अलीकडे दिग्दर्शक राजा नवाथे यांनी नाही का ' मनचली ' या आपल्या चित्रात स्वर्गवासी गुरुदत्त यांच्याच ' मि. अँड मिसेस ५५ 'ची कथा वापरलीच होती. पण मध्यंतरापर्यंत हे चित्र उत्कृष्ट स्लॅपस्टिक कॉमेडीचा नमुना होता. एका गांवढळ आणि वेंधळ्या पोराच्या गडबड घोटाळ्यामुळे धमाल उडते, इतर बेरकी माणसं उघडी पडतात. त्यांची कारस्थाने कोलमडून पडतात. कुठच्याही स्लॅपस्टिक कॉमेडीमध्ये हेच साधायचं असतं, तेच दादाने ' आंधळा 'मध्ये साधलं होतं. दादाचा चेहेरा कोरा आहे. त्याची अर्धी चड्डी, भादरलेलं डोकं, तोंडाचं उघडं बोळकं, उतरलेल्या खांद्यावरची ढगळ पैरण ह्या साऱ्या गोष्टी त्याच्या वेंधळेपणाला आता कॅरेक्टर देऊ लागल्या आहेत. बस्टर किटनचा कोरा चेहरा आणि चॅप्लिनच्या ट्रॅंपचा गबाळ्या पेहेरावच त्याने एकत्र आणला आहे. काही टीकाकारांना–आणि हे स्वतःला श्रेष्ठ टीकाकार असल्याची चुकीचा समज करून घेतात–दादाची अर्धी चड्डी आता मंजूर होत नाही. दादाने राजेश

खन्नासारखा पेहेराव करून कॉमेडी करावी असे तर यांचे म्हणणे नाही ना ? (मजा अशी की चार्ली चॅप्लिनचा गबाळघा वेश पुन्हा पुन्हा पाहून मात्र ते हसतात ! ) ' आधळा 'मध्ये दादाने खरोखरच काही नवे करून दाखविले. जे ' सोगाड्या ' आणि ' एकटा जीव 'मध्ये नव्हते. म्हणूनच दादाच्या शंभर चुका आपण माफ केल्या. न जाणो आमच्या सिनेमाला बंगालच्या रॉबी घोषनतर (' सबसे बडा सुख ' आठवतो ना ! ) एक अस्सल कॉमेडीयन मिळेल ही मला आशा वाटली. ' आधळा 'नंतर आम्ही पत्रकार दादाला भेटलो. त्यावेळी दादा पुन्हा लॉरेल हार्डीच्या गोष्टी करीत होता. ' डायलॉग्ज नकोत ' अशी भूमिका करायची आहे ' दादा म्हणाला. लगोलग एक ट्रॅडिशनल टीकाकार म्हणाला, ' मग तुमचे चित्र चालणार नाही. ' पण, मी म्हणालो, ' दादा, त्याचवेळी मी तुला खरा मानीन !' ज्या दिवशी भारतात डायलॉग्ज नसलेला चित्रपट (कॉमेडी) निघेल त्याचवेळी आपल्या चित्रपटातील नाटक नष्ट होऊन खरा चित्रपट सुरू होईल.

दादालाही आता एक वेगळा मार्ग धुडाळून काढण्याशिवाय दुसरा मार्गच नाही. ' पिंजऱ्या 'मुळे दादाला खुले असलेल्या मैदानात मातब्बर शातारामबापू उतरले आणि त्याच्या मागोमाग निळू फुले, डॉ. श्रीराम लागू, अशा मातब्बर लोकांच्या पाठीमागे उभे राहून नवे नवे मराठी सिनेमावाले मराठी सिनेमाच्या मैदानात आक्रमण करू लागले आहेत. आता दादाला ' मराठी चित्रपटात फक्त मीच आहे ' असा गर्व सागता येणार नाही. दादा आता रंगीत चित्रपट काढण्याच्या मागे लागलाय. तीन ज्युबिली हिट्स देणाऱ्या माणसाला रंगीत चित्रपट काढून, हात पोळून घेणे अशक्य नाही. कदाचित दादाचा हा प्रयोग यशस्वी होईल पण—

अलीकडे दादा आपल्या ' पाडु हवालदार ' या आगामी चित्राची जुळवाजुळव करीत असताना ती त्याला भेटलो. त्यावेळी प्रथमच नेहमी आत्मविश्वासाने बोलणाऱ्या दादापेक्षा वेगळा दादा मला पाह्यला मिळाला. ' आपल्या प्रेक्षकाच काही सांगता येत नाही हमखास ' तो म्हणाला. दादाला सातारा–कोल्हापूर–सागलीचा प्रेक्षक माहीत आहे, अस जो तो म्हणतो. पण, तोच दादा काहीसा बावरल्यागत म्हणत होता, ' प्रेक्षकांचं काही सागता येत नाही. ' ' आंधळा 'मध्ये त्याने ' बॉबी फेम ' अरुणा इराणी पेश केली होती पण आमचा प्रेक्षक म्हणाला, ' छे: ! हिला कुठे नाचता येतय. उषा चव्हाण काय नाचत्ये ! ' असा दुतोंडी प्रेक्षक दादाच्या सामोरी येऊ लागल्यामुळे दादा चाचरला होता. ' आंधळघा 'मध्ये दादामधल्या सुप्त कॉमेडीयनची चाहूल आपल्याला लागली; दादालाही पुन्हा आपल्यापुढील ' मंझील ' काय आहे याचा साक्षात्कार झाला आणि वाघासारखा हिंस्र प्रेक्षकही सामोरी आला आहे. यावेळी दादाला मला ' पॅटन ' या चित्रपटाचा अदाकार जॉर्ज सी स्कॉट काय म्हणाला होता, त्याची याद येते. ' अदाकाराला प्रेक्षकासमोर आक्रमण करून ते जिंकायचे असतात ! ' दादा, आपण त्यांना मंजूर करायच नसत. हे कलावत आणि प्रेक्षक यातल युद्ध आहे. आणि युद्धाच्या पातळीवरच तयारी करून तू प्रेक्षकांना आपल्या अदाकारीसमोर शरण आण. ' ◻

## राजेश खन्नाचा आजार

सध्या राजेश खन्नाचा हात दुखावला आहे. राजेश खन्नासारख्या तीन-तीन शिफ्टस् करणाऱ्या सुपर-स्टारचा हात दुखावतो ही फिल्म इडस्ट्रीमध्ये इक ' इव्हेंट 'च आहे. पूर्वी ' हाथी मेरे साथी 'च्या सेटवर त्याच्या डोळ्यात कचरा गेला होता; पण अफवा अशी पसरली की हत्तीच्या दाताने त्याचा डोळाच फुटला. म्हणजे दुखापत झाली नसता राजेश खन्ना एवढी गडबड मचावतो तर, आता हातच दुखावल्यानतर किती गडबड मचावील.

पण, हा जमाना आता इतका काही राजेश खन्नाचा राह्यला नसावा. त्याच्या दुखापतीमुळे पुन्हा अफवांचे पीक आले नाही हे खरे. एक गोष्ट त्याने शहाणपणाची केली ती म्हणजे तीन-तीन शिफ्टस् करून तो तंग झाला होता. तेव्हा त्याने आराम करायचे ठरवले. राजेश खन्नाचा आराम–आता निर्माते तग झाले. ' त्याग 'च्या सेटवर दिग्दर्शक दीन दयाळ शर्मा निमूटपणे सेट खाली उतरताना पहात होते. त्यांना एक अखबारवाला म्हणाला, ' फारच वाईट झाले. तुमचे नुकसान झाले. ' त्यावर दीन दयालजी म्हणाले, ' अरे, आम्हाला एवढी कशाला हमदर्दी दाखवता ? त्या ' भोला भोला 'च्या निर्मात्याला दाखवा. त्याचा लाखो रुपये खर्चून बाधलेला सेट उतरू लागलाय. '

राजेश खन्नाच्या आजारात आणखी एक सेट उतरला म्हणे. असे म्हणतात की हात दुखावताच राजेश, दिग्दर्शक हृषिकेश मुखर्जींच्या सेटवरून चार दिवस गायब झाला होता. हृषिकेश मुखर्जी ते हृषिकेश मुखर्जी ! राजेश खन्ना दुसऱ्यांच्या पुढे सुपरस्टार. हृषिदांच्या समोर...! चार दिवसानी हृषिदांच्या लक्षात आले की राजेशबरोबर आपली नवी अदाकारा आरतीही गायब आहे ! चार दिवसांनी राजेश आणि आरती दोघेही सेटवर आले. प्रथम हृषिदांनी राजेशची खरडपट्टी काढली मग आरतीची पाळी ! ' ए छोकरी, इथे ये. होतीस कुठे चार दिवस ?' आणि मग तिच्या अवताराकडे निरखून पहात म्हणाले, ' आणि गेलीस तो गेलीस पण आता कंटीन्युटी बिघडवून टाकलीस त्याचं काय ?' ती बिचारी खलास झाली.

निर्माते सतीश वागळे याना म्हणे, आणखी आपलाही सेट उतरवल्याचा भास झाला. असा राजेशचा आजार ! ◻ ◻

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**

## सप्रेम नमस्कार....

☐ दिवाळी अंकासाठी 'मी गॉर्की बोलतो आहे' हा दीर्घलेख धाडला आहे. गॉर्कीची मुळातली autobiography ६१६ पाने इतकी मोठी आहे. त्यात तीन विभाग, त्यातील महत्त्वाच्या अनुभवांचा उल्लेख वेचून हा लेख तयार केला आहे. On the bank of Volga नावाचे आणखी एक चरित्रही आधारासाठी वापरले आहे.
गॉर्कीचे अनुभव वेचण्यात सामाजिक आशयही असू शकतो. आता आपल्या समाजातले तळातले थर ढवळून निघत आहेत. त्या स्तरातही काही मंडळी जिज्ञासू, महत्त्वाकांक्षी अशी असणार. तेव्हा काहीतरी करून दाखवायची जिद्द बाळगणारा एक पोरका पोर कसा वाढतो.... त्याची प्रतिभा कशी जागृत होत जाते हे पहाणे मला अत्यंत मनोज्ञ वाटले. Gorky चे हे तिन्ही Volumes ( My childhood, In the world आणि My universities ) अत्यंत वाचनीय आहेत. वाचक अक्षरशः मुंगळ्यासारखा चिकटून बसावा इतके सामर्थ्य गॉर्कीच्या लिखाणात आहे....   –दिनांक १० ऑगस्टला सुमतीबाईंनी माणूस संपादकांना लिहिलेल्या पत्रातून

☐ गॉर्की लिहून होतो आहे. १५ तारखेपर्यंत कच्चे लिखाण पूर्ण होईल. Final प्रत तयार करण्यास २-३ दिवस तरी हवेत. २० तारखेच्या आत संपूर्ण गॉर्की आपल्या हातात असेल. त्यात पुन्हा भानगडी आहेत त्या अशा– मी गॉर्कीची २ चरित्रे अभ्यासत आहे. एक आहे अमेरिकन लेखकाचे व दुसरे रशियन लेखकाचे. त्यात भरपूर तफावत आहे. रशियन चरित्रकार सरकारी दबावाखाली असल्याने सरकारविरोधी गोष्टींचा संपूर्ण अनुल्लेख आहे. बरीच intllectual dishonesty बौद्धिक अप्रामाणिकपणा आहे. त्यामुळे सारे निवडून वेचून घ्यायला वेळ लागला– अजूनही एका चरित्रासाठी मी hunting करीत आहे. पण लोक फारच सुस्त असतात.... काय करणार ?   –दिनांक नसलेल्या आणखी एका पत्रातून

☐ गॉर्की संपत आलाय पण ते लिखाण इतके मोठे झालंय की edit करावे लागणार– अन् कितीही brief करायचे म्हटले तरी ५० ताव होणार. आधीचे ४७ ताव आहेतच. मग सांगा– एवढा मोठा लेख तुम्हाला दिवाळी अंकाला चालेल ? त्यापेक्षा पहिले ३ भागच छापून टाका.
–दिनांक १२ ऑटोबरच्या पत्रातून....

# असा माणूस दिवाळी अंकातील
# सुमती देवस्थळींचा गॉर्की
# खुलतो आहे.... साकारतो आहे....
# लहानमोठा होतो आहे....